
# माणूस

शनिवार । २३ डिसेंबर १९७८ । ७५ पैसे



ज्या दिवशी चरणसिंग
जनता पक्षापासून
दूर जातील
त्या दिवशी
पक्षाच्या झेंड्यावरील
नांगरधारी शेतकऱ्याचे चित्र
पुसून टाकावे लागेल !

## साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे-अंक तिसावा**

२३ डिसेंबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# किसान संमेलनाच्या निमित्ताने

अंतर्गत संघर्ष हा जणू जनता पक्षाचा स्थायीभाव झाला आहे प्रत्येक प्रश्नावरचे पक्षांतर्गत मतभेद ठळकपणे वृत्तपत्रांत प्रसिद्ध होत असल्याने लोकांमधील जनता पक्षाची अशी प्रतिमा होऊन बसली आहे; पण त्यामुळे एक नुकसानही झाले आहे. तात्कालीन पक्षांतर्गत सत्तास्पर्धेशी किंवा एखाद्या तात्पुरत्या प्रश्नावरील मतभेदांशी ज्यांचा संबंध नाही अशा मूल्यात्मक, सैद्धांतिक मतभेदांनाही भांडणाचेच संकुचित स्वरूप दिले जाते. मोरारजी–चरणसिंग कलह–संघर्ष हे याचे उत्तम उदाहरण आहे. मोरारजी–चरणसिंग संघर्षात मुख्य मुद्दा सत्तास्पर्धेचा नाहीच. मोरारजींनी आपल्या काम करण्याच्या व विचार करण्याच्या शैलीने या प्रश्नास संकुचित स्वरूप दिले आहे.

चरणसिंग ही काही एक व्यक्ती नाही. तो एक विचार आहे. देशातली इंग्रजी वर्तमानपत्रे, इंदिराजींच्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचणारे (तथाकथित काँग्रेसजन) भाट आणि भारतीय वास्तवाचे भान सुटलेले पोथीनिष्ठ सैद्धांतिक राजकारणी यांनी आपल्या प्रचारातून निर्माण केलेली चरणसिंगांची प्रतिमा विसरून गेल्याशिवाय त्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी व भारतीय राजकारणातील त्यांच्या स्थानाविषयी पूर्वग्रहरहित विचार अशक्य आहे. चरणसिंग यांच्यावरील, अशा रूढ समजांवर आधारित आक्षेपांचे विस्तृत खंडन वस्तुनिष्ठपणे, प्रत्यक्ष आधारांसहित करणे सहज शक्य आहे; पण इथे ते अभिप्रेत नाही.

डॉ. राम मनोहर लोहियांच्या नंतर त्यांच्या परिवाराबाहेरचे चरणसिंग हेच एक राजकीय नेते असे आहेत की, ज्यांनी भारतीय अर्थकारण व राजकारणातला खरा प्रश्न निर्भयपणे समोर आणला आहे. त्यांनी सरळच सांगून टाकले आहे, 'हा झगडा नेहरूवाद विरुद्ध गांधीवाद असा आहे आणि मी गांधीवादाच्या बाजूने उभा आहे.' वरवर पाहता हे विधान उथळ, सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी केलेले वाटते. तसे ते अनेकांना वाटलेही आहे; पण स्वातंत्र्यानंतर ज्या पद्धतीने नेहरूंनी या देशाच्या अर्थकारणाचा व राजकारणाचा विकास केला त्याकडे डोळसपणे पाहणाऱ्या कोणालाही, या देशात महात्मा गांधींच्या धोरणांचा व तत्वांचा सर्वात जास्त पराभव पं नेहरूंनी केला आहे, हे पटायला काहीही प्रत्यवाय नाही. रशियातील नियोजनांवर आधारित 'महालनविस मॉडेल' प्रमाण मानून या देशात जे नियोजन नेहरूंनी सुरू केले, त्यामुळे या देशाचे शहरी भारत व ग्रामीण भारत असे उभे विभजन झाले. शेती

हा या देशातील प्रमुख उद्योगधंदा आहे, तो किफायतशीर होत नाही तोपर्यंत देश आर्थिक व अन्य दृष्टींनीही सुधारणे, सुस्थितीत येणे शक्य नाही, हे ज्या पंतप्रधानास दिसले नाही, तो कसला द्रष्टा भारतभाग्यविधाता? भारतीय अर्थव्यवस्थेतले शेतीचे हे स्थान न ओळखता शहरी उद्योगधंदे, अवजड कारखाने यांना अतिरिक्त महत्त्व देऊन Conspicuous consumptionवर आधारित अशी शहरी औद्योगिक संस्कृती नेहरूंनी निर्माण केली. टेलिव्हिजन, सौंदर्यप्रसाधने, रेफ्रिजरेटर्स, पंखे, उंची तलम कापड आणि या सारख्या अन्य उपकरणांची निर्मिती भारतासारख्या गरीब देशात किती होऊ द्यायची याचा काही तरी विवेक नको का? गांधींच्या विचारांवर या देशाची उभारणी करण्याचा दावा सांगणाऱ्या त्यांच्या शिष्योत्तमाने तरी या दिशेने देश जाऊ नये यासाठी काही करायला हवे होते, ही अपेक्षा व्यर्थ म्हणता येईल का? 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' हे एका वेगळ्या अर्थाने नेहरूंनी सिद्ध करून दाखविले आहे!

भारतीय अर्थकारणाला सर्वथा चुकीची दिशा देऊन नियोजनाचे जेवढे वाटोळे झाले, तेवढेच राजकारणाचेही झाले हे गेल्या तीस वर्षांच्या इतिहासांची पाने सहज चाळली तरी ध्यानी येईल. 'नेहरू स्टाईल ऑफ पॉलिटिक्स' जोपर्यंत बंद होत नाही तोपर्यंत राजनीतीला लोकनीती बनविण्याचे स्वप्न, केवळ स्वप्नच राहील.


हा आहे चरणसिंगांचा विचार. जनता पक्षाने लोकसभा निवडणुकांच्या निमित्ताने जो जाहीरनामा काढला त्यात या दृष्टिकोनास अधिकृत मान्यता प्रदान केली आहे, तसे वचन जनतेला देण्यात आले. जे पक्षाने मान्य केले आहे, ते अंमलात आणण्यासाठी आग्रह धरणारे चरणसिंग पक्षविरोधी कसे काय ठरतात? या देशातला किसान हाच खरा देशाचा मालक, केंद्रबिंदु आहे म्हणून त्याच्या हितसंबंधांभोवती इथल्या आर्थिक नियोजनाची उभारणी झाली पाहिजे हा चरणसिंगांचा आग्रह अयोग्य असे म्हणता येईल का?

पण मुख्य प्रश्नांवरून जनतेचे लक्ष विचलित करून, गैरमहत्त्वाच्या बाबींना प्राधान्य देऊन, आपले स्थान राखण्याची कला अवगत झालेल्या नेहरू पठडीतील राजकारण्यांनी बरोबर उलटे स्वरूप या संघर्षास दिले. चरणसिंग हे किसानांचे नेते आहेत, म्हणजे ग्रामीण भागाचे नेते आहेत. ग्रामीण विकासास झुकते माप म्हणजे आपल्या खिशाला भोक हे माहीत असलेल्या बड्या भांडवलदारांच्या वृत्तपत्रांनी धोका ओळखून चरणसिंगविरोधी प्रचार सुरू ठेवला आहे.

म्हणूनच किसान मेळावा ही कोण्या व्यक्तीचे स्तोम वाढविणारी किंवा पक्षात फूट पाडणारी घटना नसून जनता पक्षामागे किसानांची ताकद उभी करणे आहे. जाणकारांनी या गोष्टीचे महत्त्व जाणून चरणसिंगांचा विचार बळकट केला पाहिजे.

चरणसिंग जनता पक्षापासून दूर जाणे म्हणजे जनता पक्षाचा गुरुत्वमध्य ढळणे होय. ज्या दिवशी चरणसिंग जनता पक्षापासून दूर जातील त्या दिवशी पक्षाच्या झेंड्यावरील नांगरधारी शेतकऱ्याचे चित्र पुसून टाकावे लागेल!

**–रत्नाकर महाजन**



# अस्थिरता

## लोकशाहीला धोका

वा. दा. रानडे

बिहार पुन्हा अस्थिरतेच्या काठावर उभा आहे. ही अस्थिरता दोन प्रकारची आहे. एक कायदा व सुव्यवस्था ढासळल्यामुळे निर्माण झालेली अस्थिरता आणि दुसरी सरकारची अस्थिरता. एकीकडे राखीव जागा विरोधकांनी राज्यभर आंदोलन सुरू केले असून त्याला विध्वंसक वळण मिळाले आहे. सरकारी मालमत्तेची जाळपोळ व मोडतोड चालू आहे, तर दुसऱ्या बाजूला सत्तारूढ जनता पक्षातल्याच बंडखोर गटाने मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांचे नेतृत्व बदलण्याची मागणी केली आहे. या मागणीमागे काही बळ नाही असा दावा श्री. ठाकूर यांनी केला आणि पक्षाची बैठक बोलावून आपल्यामागे बहुमत असल्याचे सिद्ध करायला आपली केव्हाही तयारी असल्याचे सांगितले.

चरणसिंगगट जनता पक्षातून बाहेर पडण्याच्या विचारात आहे. त्या पार्श्वभूमीवर या नेतृत्वबदलाच्या हालचालींकडे पाहायला हवे. तुम्ही जनता पक्षातून बाहेर गेलात की, तुमचे मुख्यमंत्री असलेली मंत्रिमंडळे गडगडतील असा एक प्रकारे इशारा चरणसिंगविरोधी किंवा भालोदविरोधी गट त्यांना देत आहेत. आज हरियाना, बिहार आणि उत्तर प्रदेश या तीन राज्यांत भालोदचे मुख्यमंत्री आहेत. या तीन राज्यांतील आपली सत्ता टिकविण्यासाठी चरणसिंगगट जनता पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय पुढे ढकलील असा अंदाज केला जात आहे. चरणसिंगांनी आपण जनता पक्षाबाहेर पडणार नाही असे म्हटले असले तरी राजकीय निरीक्षक त्यावर विश्वास ठेवायला तयार नाहीत. सरकारमध्ये किंवा पक्षात महत्त्वाचे स्थान मिळत नसेल तर चरणसिंगांना पक्षात फार काळ राहण्यात स्वारस्य वाटणार नाही. गृहमंत्रीपद तर आपल्याला मिळत नाहीच; पण पक्षात तरी आपल्याला महत्त्वाचे स्थान मिळणार आहे की नाही अशीही शंका त्यांना येऊ लागली आहे. उत्तर प्रदेशात जनता पक्षाच्या निवडणुकांसाठी जे निरीक्षक नेमण्यात आले त्यात आपल्या गटाला योग्य प्रतिनिधित्व मिळाले नाही म्हणून निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याची धमकी चरणसिंगगटाने दिली. वास्तविक असा बहिष्कार टाकला तर त्यात चरणसिंगगटाचेच नुकसान आहे; पण त्यांची तक्रार रास्त असेल तर तिची दखल घेतली गेली पाहिजे. निरीक्षकांची नावे दोन महिन्यांपूर्वीच जाहीर झाली होती, तेव्हा चरणसिंगगटाने काही तक्रार केली नाही आणि आताच केली त्या अर्थी हा नंतर सुचलेला विचार आहे असे उत्तर चरणसिंगगटाच्या आक्षेपाला देण्यात आले, तेही विचारात घेतले पाहिजे. बहिष्काराची धमकी देऊन चरणसिंगगट पक्षाबाहेर पडण्यास निमित्त शोधीत आहे असे दिसते.

जनता पक्षात फोडाफोड करावयाची, त्याच्या मित्रपक्षांपासून त्या पक्षाला अलग पाडावयाचे आणि जनता पक्षाविरुद्ध बाकी सर्व पक्षांची आघाडी करावयाची या दिशेने इंदिरा गांधींच्या हालचाली चालू आहेत. चरणसिंग आणि अरस यांची भेट या संदर्भात महत्त्वाची म्हटली पाहिजे. अशा भेटी केवळ ख्यालीखुशालीसाठी कधीच नसतात. चरणसिंग वेगळा पक्ष काढून पंतप्रधान होत असतील तर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ असे इंदिरा गांधींनी सूचित केले असल्याच्या बातम्या आहेत. चरणसिंगांचा राजकीय पूर्वेतिहास पाहिला तर आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी सोयिस्कर वाटेल त्या पक्षाशी आघाडी करण्याची त्यांची तयारी असते असे दिसून येईल. उत्तर प्रदेशामध्ये १९६७ च्या निवडणुकांनंतर मुख्यमंत्री बनण्याची त्यांची आकांक्षा होती. काँग्रेसने त्यांना मुख्यमंत्री केले नाही तेव्हा आपल्या गटासह काँग्रेसबाहेर पडून त्यांनी मंत्रिमंडळाचा पराभव केला. विरोधी पक्षांनी आघाडी बनवून त्यांना मुख्यमंत्री केले. ही आघाडी फार काळ टिकली नाही. पुढे १९६९ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर इंदिरा गांधींच्या काँग्रेसच्या कमलापती त्रिपाठीगटाशी आघाडी करून चरणसिंगांनी संयुक्त मंत्रिमंडळ बनविले होते. सत्तेसाठी अशा संधिसाधू सोयरिकी त्यांनी पूर्वी केलेल्या आहेत व यापुढेही करतील.

आपल्याला गृहमंत्रीपद नाकारणाऱ्या मोरारजीभाईंचे सरकार पाडावयाचे आणि स्वतः पंतप्रधान व्हावयाचे असे चरणसिंगांचे मनसुबे आहेत, लोकसभेच्या एकूण ५४२ जागांपैकी आठ जागा रिकाम्या आहेत त्या सोडता ५३४ जागा जनता पक्षाचे सभासद ३०३ आहेत. निर्णायक बहुमतासाठी किमान २६८ सभासदांचा पाठिंबा हवा. चरणसिंग गटाचे किमान ४० सभासद फुटले तरी जनता पक्षामागे निर्णायक बहुमत रहात नाही. मित्रपक्षाच्या पाठिंब्यावर जनता सरकार टिकून राहील म्हणून मित्रपक्षांना जनता पक्षापासून अलग करावयाचे या राजकीय डावपेचांवर इंदिरा गांधी यापुढे लक्ष केंद्रित करतील असे दिसते. मार्क्सवाद्यांशी संधान बांधण्याच्या त्यांच्या हालचाली चालू आहेत. अकाली अण्णा द्र. मु. क. चा त्यांना पाठिंबा आहेच, अकाली दल, शेख अब्दुलांची नॅशनल कॉन्फरन्स, शे. का. पक्ष वगैरे गटांचाही पाठिंबा मिळविण्याचे प्रयत्न होतील. या प्रयत्नांना लागलीच यश येईल असे नाही; पण जनता पक्षात फूट पडली तर मित्रपक्षांतही त्या पक्षाबद्दल आपुलकी किती काळ राहील ?

चरणसिंग नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच नवा पक्ष काढणार अशा बातम्या आहेत; पण इतकी घाई न करता मोरारजीभाईंच्या जागी दुसरा नेता निवडा या मागणीवर भर देऊन तिचा निकाल काय लागतो हे पाहून ते आपले धोरण ठरविण्याचा अधिक संभव आहे. मोरारजीभाईंच्या नेतृत्वावर केवळ चरणसिंगगटच नव्हे तर इतर गटही नाराज आहेत; पण मोरारजीऐवजी दुसरा नेता कोण शोधावयाचा या प्रश्नावर पक्षात एकमत होणे कठीण आहे. चरणसिंगांना नेतेपदी निवडले तर बाबू जगजीवनराम यांचा गट नाराज होऊन बाहेर पडण्याचा संभव आहे. घटनांना कसेही वळण मिळाले तरी पक्षात फूट पडणे यापुढे अटळ दिसते.

बिहारमध्ये मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या नेतृत्वास बंडखोर गटाने दिलेल्या नव्या आव्हानाचा या पार्श्वभूमीवर विचार करायला हवा. ठाकूर यांच्या नेतृत्वास हे तिसऱ्यांदा आव्हान आहे. पहिल्यांदा आव्हान मिळाले तेव्हा ठाकूर यांनी पक्षाची बैठक बोलावून विश्वासाचा ठराव पास करून घेतला दुसऱ्यांदा आव्हान मिळाले तेव्हाही पक्षाची बैठक घेण्याची तयारी ठाकूर यांनी दर्शविली होती; पण आपल्याला फारसा पाठिंबा नाही असे दिसून येताच बंडखोर गटानेच पक्षबैठकीबद्दल आग्रह धरला नाही. आता त्या गटाने पुनः उचल खाल्ली आहे. माजी मुख्यमंत्री बी. पी. मंडल यांना नेते म्हणून निवडावे अशी बंडखोर गटाची मागणी आहे. नेतेपदाच्या पहिल्या निवडणुकीतील ठाकूर यांचे प्रतिस्पर्धी एस्. एन्. सिन्हा यांचा बंडखोर गटाला पाठिंबा आहे. वास्तविक समस्तीपूरची निवडणूक जिंकल्यानंतर त्यांचे आसन बळकट झाले असे मानले जात होते, पण त्या निवडणुकीनंतर एवढ्या थोड्या अवधीत बंडखोर गटाने ठाकूर विरोधी मोहीम पुनः सुरू करावी याचे आश्चर्य वाटते. पिछड्या जमाती विरुद्ध उच्च जमाती असा संघर्षही यामागे असणे शक्य आहे. पक्षनेतृत्व बदलण्याची मागणी अशी मधून मधून सारखी होत राहणे हे पक्षातील बेशिस्तीचे आणि असंतोषाचेच निदर्शक आहे. त्यातून अस्थिरता आणि लोकशाहीला धोका वाढत जाईल. □

## मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# □ अमेरिकन आदिवासी

भारतातील आदिवासींच्या विकासाचे प्रयत्न सुरू होऊन आता बरीच वर्षे झाली आहेत. अनेक राज्यांनी आदिवासी उपयोजना सुरू केल्या आहेत व त्या अंतर्गत आदिवासींच्या सर्वांगीण-विकासाची वाटचाल सुरू झाली आहे. असे असले तरी आदिवासीविकास ही बाब अद्याप प्रामुख्याने सरकारी पातळीवरच व सरकारी शैलीनेच हाताळली जाते. त्यामुळे आदिवासी-विकास म्हणजे आदिवासी शेत-मजुरांची संघटना, त्यांच्यासाठी चांगल्या शाळा, चांगली घरे, चांगले रस्ते अशा गोष्टींचा प्रामुख्याने विचार केला जातो व ते आवश्यकही आहेच.

पण अद्ययावत समाजापासून कैक योजनेदूर असलेल्या आपल्यापूर्वीच्याच नैसर्गिक, स्वाभाविक शैलीचे जीवन जगणारे हे आदिवासीआधुनिक समाजजीवनाच्या जवळपास येण्याचा प्रयत्न करीत असतानाची स्थित्यंतरे, त्याच्या प्रतिक्रिया, त्यांचे स्वरूप हा समाज-जीवनशास्त्रातील एक संशोधनाचा विषय ठरेल. अशा प्रकारचा अभ्यास आदिवासींना विकासाची फळे वाटत असताना अधिक आवश्यक ठरतो. ह्या समाजाच्या मूळ प्रवृत्ती, ह्या समाजातील सुस्थापित जीवन पद्धती यांच्या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर ह्या समाजात आधुनिकता कशी रुजेल, ती कितपत मानवेल याचा नीट अंदाज घेता येतो, येत असावा.

असा अभ्यास किती महत्त्वाचा असतो याची कल्पना, अलीकडेच अमेरिकेतील आदिवासी लोक जीवनाच्या अभ्यासक, प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. श्रीमती रायना ग्रीन यांचे भाषण ऐकल्यानंतर आली. मुंबईतील अमेरिकन सेंटरच्या विद्यमाने हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

अमेरिकेच्या असोसिएशन फॉर द अॅडव्हान्समेंट ऑफ सायन्स या संस्थेने 'वैज्ञानिक जगतात अमेरिकन आदिवासी' या नावाचा एक प्रकल्प हाती घेतला असून डॉ. श्रीमती ग्रीन या ह्या प्रकल्पाच्या संचालिका आहेत. अमेरिकेत वास्तव्य करून असलेल्या सर्व जमाती. रेड इंडियन्स, अमेरिकन इंडियन्स इ. काही सुप्रसिद्ध जमातींचाही यात समावेश होतो.

अमेरिकेत या आदिवासी विकासाचे 'शास्त्र' बनविण्यात आले याला दोन प्रमुख कारणे आहेत. एक म्हणजे वैज्ञानिक चिकित्सा, वैज्ञानिक दृष्टी यांचे भान ठेवून अभ्यास करण्याची आधुनिक अमेरिकनांची पद्धत! दुसरे कारण अधिक महत्त्वाचे आहे. अमेरिकन सेंटरच्या 'बॅकग्राउंडर' ने म्हटल्याप्रमाणे अमेरिकेतील एकूण खनिज कोळशापैकी १/३ भाग, युरेनियम साठ्यापैकी ३०% पेक्षा अधिक खनिजसाठा आणि ३ ते ४ % खनिज तेल व नैसर्गिक वायु एवढी प्रचंड खनिजसंपत्ती अमेरिकन आदिवासी ज्या भागात रहातात त्या भागात सापडते. आता जमिनीच्या पोटातले हे धन उकरून काढायचे तर जमिनीच्या मालकाला डावलून कसे चालेल? खनिज हस्तगत करताना आदिवासींचे सहकार्य हवेच.शिवाय खनिजसंपादन हे यंत्रशक्तीचे काम आणि आदिवासी तर यंत्रजीवनाशी अपरिचित. अशा सगळ्या समस्या सोडवितानाच की काय पण अमेरिकन आदिवासींचे आधुनिकीकरण हे विशेष महत्त्वाचे शास्त्र बनत गेले.

स्वत: अमेरिकन आदिवासी असलेल्या श्रीमती रायना ग्रीन यांनी अमेरिकन आदिवासी व एकूण अमेरिकन लोकजीवनाच्या अभ्यासावर १९७३ मध्ये डॉक्टरेट संपादन केली आहे. विविध विद्यापीठांच्या संशोधनविभागात त्यांनी काम केले आहे व सध्या अनेक विद्यापीठांच्या लोकजीवनशास्त्रविभागाच्या सल्लागार म्हणूनही त्या काम पहात आहेत. सध्याच्या समाजजीवनात परंपरागत व रूढीग्रस्त जमातींना विज्ञान व तंत्रज्ञानाची ओळख करून देताना उभ्या रहाणाऱ्या समस्यांबाबत श्रीमती ग्रीन आपल्या भारताच्या दौऱ्यात व्याख्याने देत आहेत.

'अविकसित समाजाचे स्वत:चे असे एक परंपरागत विज्ञान असते. त्यामुळे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान त्यांना सहजासहजी पचत नाही. अशा वेळी त्यांचा ज्यांच्यावर विश्वास आहे, अशा त्यांच्यातीलच सुशिक्षित आदिवासी तरुणांमार्फत विज्ञानाशी त्यांची ओळख करून द्यायला हवी, असे श्रीमती ग्रीन यांचे मत आहे.

अमेरिकेत आदिवासींचे आधुनिकीकरण ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. कारण आपल्याजवळची वनसंपत्ती व खनिजसंपत्ती हिरावून घेण्यासाठी सुधारलेले लोक आपल्याकडे आले आहेत असा एक दृष्टिकोन या लोकांनी बाळगला आहे. श्रीमती ग्रीन यांनी ही समस्या समजावून सांगितली व त्या म्हणाल्या की, विज्ञान व तंत्रज्ञान ही साधने ह्या समाजाला वाचविण्यासाठी आहेत, उध्वस्त करण्यासाठी नाही हे यांना समजावून सांगितले पाहिजे.

आदिवासी समाजावर विज्ञान व तंत्रज्ञान लादणे योग्य नाही हे खरेच; पण विज्ञान व तंत्रज्ञानाचा त्यांच्यावर उलट परिणाम होईल व त्यांची मूळ संस्कृती, जीवनपद्धती उद्ध्वस्त होईल असे मानणेही चुकीचे आहे. श्रीमती ग्रीन पुढे म्हणाल्या की, अशा परिवर्तनाच्या केवळ दृश्य-परिणामांवरून निष्कर्ष काढणे योग्य नाही. आदिवासींचे मानसिक परिवर्तन अधिक महत्त्वाचे आहे. संस्कृती ही कधीच परिवर्तनाच्या आड येत नसते. परिवर्तन घडविण्याची पद्धत जर शास्त्रीय असेल तर कोणतीही संस्कृती त्याला अनुकूल प्रतिसाद देईल.

श्रीमती ग्रीन यांनी मांडलेला एक मुद्दा महत्त्वाचा आहे. त्या म्हणाल्या की, आपण सुशिक्षितांनी आदिवासी समाजजीवनात जे काही परंपरागत विज्ञान आहे त्याचा अभ्यास केला पाहिजे. या विज्ञानाची आपण ओळख करून घेत असतानाच आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचविले पाहिजे.

श्रीमती ग्रीन यांच्या भाषणानंतर श्रीमती दुर्गा भागवत यांनी भारतीय आदिवासी लोकजीवनाच्या संदर्भात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या

विकासाचा आढावा घेतला. छत्तीसगढ भागात आदिवासींमध्ये काम करताना त्यांना स्वतःला आलेले काही अनुभवही त्यांनी सांगितले.

या भाषणानंतर 'मोअर दॅन बोज अ‍ॅड अ‍ॅरोज' या नावाची एक उद्बोधक फिल्म दाखविण्यात आली. आदिवासी जीवनाचे परंपरागत विज्ञान व तंत्रज्ञान इ. ची बाह्य जगाला ओळख व्हावी म्हणून श्रीमती ग्रीन यांच्या मार्गदर्शनाखाली ही फिल्म तयार करण्यात आली होती. अमेरिकन आदिवासींचे खेळ, त्यांचे शिल्पशास्त्र, लोककला इ. विषयांवरही अशा फिल्मस् संबंधित अमेरिकन संस्था काढणार आहे.

आपल्याकडे आदिवासी लोकजीवनाची इतकी चिकित्सा किंवा असा अभ्यास फारसा झालेला नाही; पण आदिवासींच्या आर्थिक विकासावरोबरच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व विज्ञान-तंत्रज्ञान त्या त्या भागात रुजविण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतात ते करताना असा अभ्यास निश्चितच मार्गदर्शक ठरेल. किमान आदिवासी क्षेत्रात वर्षानुवर्षे काम करणाऱ्यांचे अनुभव जरी संकलित करता आले तरी तेही नसे थोडके. सरकारी शैलीतील कोरडेपणा काढून टाकण्यास त्याचा नक्कीच उपयोग होईल. □

# चल रे कुत्र्या : कुत्र्यांची आयात

अलीकडेच एका विदेशी वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या बातमीनुसार 'ग्रेहाउंड रेसिंग इंडिया' या मुंबईतील एका कंपनीने ग्रेहाउंड जातीचे ४० कुत्रे आयात करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी १६० लाख रुपये एवढा प्रचंड खर्च होणार आहे.

क्षणभर या बातमीवर विश्वासही बसणार नाही. कुत्र्यांची आणि आयात कशासाठी ? मुंबईत काय कमी कुत्रे आहेत ? असे प्राथमिक प्रश्नही कदाचित मनात येतील; पण वेळ कसा घालवावा याची चिंता असलेले काही नवश्रीमंत मुंबईकर वारंवार घोड्यांवर पैसे लावून आता कंटाळले असणार, हे खरे म्हणजे तुमच्या-आमच्या लक्षात यायला हवे. क्रिकेट कसोटी सामने पूर्वी जिथे होत असत त्या ब्रेबॉर्न स्टेडियमचा 'सदुपयोग' व्हावा व घोड्यांऐवजी For a change जरा कुत्र्यांची दौड बघावी आणि डोळ्यांचे पारणे फेडावे या उदात्त हेतूनेच ही कुत्र्यांची आयात होणार आहे.

ही मूळ योजना आहे क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या सदस्यांच्या सुपीक डोक्यातली. इथे कुत्र्यांच्या शर्यती होऊ शकतील हे लक्षात घेऊन व त्याचा पाठपुरावा करून या क्लबच्या सदस्यांनी १९७६ मध्येच कुत्र्यांच्या शर्यतीला अनुमती देणारे विधेयक विधानसभेत आणून संमत करवून घेतले. कुत्र्यांच्या शर्यतीसाठी ग्रेहाउंड जातीचे कुत्रेच केवळ उपयुक्त असतात व ते ब्रिटन आणि आयर्लंडमध्येच उपलब्ध असतात. स्वाभाविकच नवधनिकांची ही हौस पूर्ण करण्यासाठी विदेशी चलन खर्च करणे क्रमप्राप्त आहे.

वस्तुतः कुत्र्यांच्या शर्यतीला अनुमती देत असतानाच सरकारने कुत्र्यांच्या खरेदीसाठी विदेशी चलन मिळणार नाही हे स्पष्ट केले होते; पण तरीही प्रकाशित बातमीनुसार दोन वर्षांच्या आत ४० ग्रेहाउंड कुत्र्यांची एक तुकडी मुंबईत येणार आहे. अर्थातच परदेशांतून. यातील प्रत्येक कुत्र्याची किंमत सुमारे ४०,००० रुपये आहे. हे कुत्रे भारतात आल्यावर त्यांचा लिलाव केला जाईल व कुत्र्यांचे खरेदीदार या कुत्र्यांना शर्यतीत उतरवून आपले पैसे परत मिळवू शकतील.

हे समर्थांघरचे श्वान कोणत्याही प्रकारे विकले गेले तरी विदेशी चलन जाणारच. फक्त ते नजरेस येऊ नये म्हणूनच हा लिलावाचा फार्स रचण्यात आला आहे असे कोणालाही वाटेल. या एकूण प्रकरणाचे गूढ इथेच संपत नाही. मुळात आधी रक्कम वसूल न करता आयरिश ग्रेहाउंड कंपनी भारतात कुत्रे पाठवीत आहे ते कोणावर मेहेरबानी म्हणून ? हास्यास्पद बाब म्हणजे ह्या कुत्र्यांना होणारी पिल्ले या कंपनीने परत मागितली आहेत; पण कुत्री विकल्यावर त्यांच्या पिल्लांवर कंपनीचा हक्क कसा काय ? की हीही एक भूलथाप आहे ? या कंपनीने ब्रिटनमध्येच हे पैसे वसूल केले नसतील कशावरून ? मग एवढी प्रचंड रक्कम कोणी व कशी भरली ? जसजसा विचार करावा तसतसे हे गूढ अधिकच वाढत जाते.

आवश्यकता आहे ती या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीची. आमचे 'जागरूक' लोकप्रतिनिधी यात लक्ष घालतील काय ? □

# □ नौदलसप्ताह

मुंबईत आणि देशात सर्वत्रच भारतीय नौदलाने नुकताच नौदलसप्ताह साजरा केला. (डिसेंबर दोन ते दहा) जनतेशी, ज्यांच्या पैशातून देशाच्या संरक्षणव्यवस्थेतील या यंत्रणेची उभारणी झाली त्या लोकांशी संपर्क रहावा आणि आपले नौदल म्हणजे काय ? ते किती शक्तिशाली आहे इ. समजून घेण्याची संधी त्यांना मिळावी या हेतूने हा नौदलसप्ताह दरवर्षी साजरा केला जातो. या सप्ताहातच नौदलातील अपंग किंवा युद्धात कामी आलेल्या जवानांसाठी कल्याणनिधी उभारण्याची मोहिमही अधिक वेगाने राबविली जाते.

या वर्षीच्या 'नौदलसप्ताहात इतर अनेक कार्यक्रमांवरोबरच 'बीटिंग रीट्रीट' हा एक देखणा कार्यक्रमही सादर केला गेला. युद्धभूमीवर दिवसभराच्या चकमकी संपल्याची व सैनिकांना छावणीत परतण्याची सूचना देण्यासाठी रणवाद्ये वाजविण्याची प्रथा पूर्वीपासून आहे; पण युद्धाच्या आधुनिक स्वरूपात सूर्य मावळल्यावरही किंवा मावळल्यानंतरच सैनिकी हालचालींना वेग येत असल्यामुळे ही प्रथा टिकून राहिली नाही. ह्या जुन्या प्रथेची आठवण म्हणून हा कार्यक्रम या वर्षी सादर करण्यात आला. सूर्य मावळत असताना निळ्याशार समुद्राच्या पार्श्वभूमीवर, नेव्हीनगर भागातील कोहली स्टेडियमवर शुभ्र वेशातील नौदलसैनिकांच्या घोषपथकाने जे धीरगंभीर स्वर आळवले ते व एकूणच तो समारंभ अनेक दिवस लक्षात राहील.

या नौदलसप्ताहाचाच एक भाग म्हणून भारतीय नौदलाची 'विक्रान्त' ही एकमेव विमानवाहू नौका जनतेला पाहण्यासाठी खुली ठेवण्यात आली होती. या सप्ताहात अक्षरशः हजारो आबाल वृद्धांनी भारतीय नौदलाचे भूषण ठरलेली ही युद्धनौका बघितली.

भारतीय नौदलाच्या या युद्धनौकेने १९७१ च्या युद्धात गोलाची

कामगिरी बजावली. या नौकेवर सीहॉक व ऑलिझेस या जातीची विमाने उतरण्याची व त्यांच्या उड्डाणाची सोय आहे; परंतु ही विमाने जागतिक युद्धतंत्राच्या दृष्टीने कालबाह्य झाली आहेत. यांच्या ऐवजी हॅरिअर या अधिक प्रगत जातीच्या विमानांचा वापर सर्वत्र सुरू झाला आहे; परंतु हॅरिअर विमाने उतरण्यासाठी योग्य ती तंत्ररचना 'विक्रांत' वर नाही. स्वाभाविकच 'विक्रान्त' मोडीत घालणे किंवा तिच्यात आवश्यक ते फेरफार करणे हे दोनच पर्याय भारतीय नौदलासमोर होते.

भारतीय नौदलाने यातला दुसरा विक्रान्तच्या 'नूतनीकरणाचा' पर्याय स्विकारला आहे. यामागे काही महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे नवी विमानवाहू नौका घेणे हे प्रचंड खर्चाचे काम आहे. शिवाय कोणतेही युद्ध साहित्य खरेदी करताना, आंतरराष्ट्रीय ताणतणाव व साहित्य-खरेदीचा होणारा गाजावाजा हानिकारक ठरतो. या अडचणी लक्षात घेऊन 'विक्रांत' च्या नूतनीकरणाचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी एक खास विभाग नौदलात उघडण्यात आला आहे. हे काम सुमारे दोन वर्षात पूर्ण होण्याची शक्यता आहे. हॅरिअर विमानांसाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्याबरोबरच १९६२ मध्ये खरेदी केलेल्या या नौकेची सर्वसाधारण डागडुजी करण्याचे कामही या काळात करावे लागेल. ही डागडुजी मुंबईच्याच गोदीत होणार आहे. या नूतनीकरणासाठी येणारा खर्च वीस लाखांपेक्षा अधिक असणार हे खरेच; पण नवीन खरेदी करताना द्यावे लागणारे परकीय चलन त्यामुळे वाचू शकेल आणि हा फायदा दुर्लक्षणीय नाही.

पूर्वीच्या रॉयल इंडियन नेव्हीचे स्वातंत्र्योत्तर काळात इंडियन नेव्ही (भारतीय नौदल) असे नामकरण झाल्यापासून नौदलाची वाढ व प्रगती वेगाने होत आहे. अर्थात असे असले तरी भारताची प्रचंड किनारपट्टी व अरबी समुद्रात सापडणारे तेल, नैसर्गिक वायू, इ. लक्षात घेता नौदलाच्या विकासाला खूपच वाव आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशाच्या तुलनेत आपले नौदल खूपच अल्प विकसित आहे. आपल्याकडे केवळ एक विमानवाहू नौका व फक्त चार 'लिअँडर क्राफ्ट फ्रिगेटस्' (हेलीकॉप्टरची सोय असलेल्या युद्धनौका) आहेत. तसेच भारतीय नौदलाकडे फक्त दोन व तेही अगदी छोटे युद्धनौकांचे तांडे (काफिला/आरमार) आहेत. अमेरिकन नौदलाकडे अशी सात आरमारे आहेत व त्यांचे एक आरमार आपल्या पाच आरमारांइतके शक्तिशाली असते.

अलीकडेच आपल्या नौदलात आपण तटरक्षकदल स्थापन केले आहे. या दलाकडे सध्या दोन गस्त नौका आहेत व मुख्यत्वे सागरी तेलसाठ्यांच्या रक्षणासाठी हे दल कार्य करते; पण आपल्या अख्ख्या नौदलाइतके अमेरिकेचे एक तटरक्षक दल आहे, हे लक्षात घेता भारतीय नौदल व त्याच्या उपविभागांचा अद्याप खूप विकास होणे आवश्यक आहे, हे लक्षात येते. ◻

### चुकीची दुरुस्ती

(दि. ९ डिसेंबरच्या अंकातील 'मुंबई वार्ता' या सदरातील 'देखणी शीर्षके' या शीर्षकाखालील मजकुरात मुद्राराक्षसाने एक घोटाळा केला आहे. या मजकुरात तीन-चार वेळा एक संस्थेचे नाव 'स्वस्तिक सोसायटी' असे छापले गेले आहे. ते वस्तुतः स्पास्टिक (Spastic) सोसायटी असे आहे.)

# पत्रमहर्षी श्री. शं. नवरे

लोकमान्य टिळकांच्या परंपरेतले, खऱ्याखुऱ्या रामशास्त्री बाण्याचे पत्रकार आणि एक थोर समाजसेवक श्री. श्रीपाद शंकर तथा काकासाहेब नवरे यांच्या निधनामुळे मुंबईतील पत्रकारांना खऱ्या अर्थाने मार्गदर्शन करणारे एक ज्येष्ठ, वडीलधारे व्यक्तिमत्त्व हरपले!

लहानपणापासूनच सार्वजनिक कार्याची कै. काकासाहेबांना विलक्षण ओढ होती. तरुणपणी 'प्रताप' हे साप्ताहिक काढून पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला. त्यानंतर 'लोकमान्य', 'प्रभात', 'गोमंतवाणी' इ. अनेक वर्तमानपत्रे आणि साप्ताहिकांमधून त्यांनी मराठी पत्रकारितेची अमूल्य सेवा केली.

काकासाहेबांच्या सार्वजनिक कार्याचे आगळेपण म्हणजे परस्परविरोधी विचारांच्या वर्तुळात त्यांचे सारख्याच आपुलकीने स्वागत होत असे. कम्युनिस्ट मंडळींशी त्यांचा निकटचा संबंध होता. स्वातंत्र्यपूर्व काळात कम्युनिस्ट पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांचा धोका आणि रोष पत्करूनही आश्रय देण्याचे धाडस काकासाहेबांनी दाखविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळराव देशमुख, जमनादास मेहता इ. अनेकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. आंबेडकरांबद्दल तर त्यांना इतका आदर होता की, दरवर्षी बाबासाहेबांच्या महानिर्वाणदिनी दादरच्या चैत्यभूमीवर जाऊन काकासाहेब सश्रद्ध मनाने वंदन करीत असत.

कै. काकासाहेब कडवे हिंदुत्वनिष्ठ होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शेकडो कार्यकर्त्यांना ते पितृतुल्यच होते. संघवर्तुळातही काकासाहेबांबद्दल अतिशय आदर व्यक्त होत असे. सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस आणीबाणीनंतर कारागृहातून सुटून मुंबईत आले तेव्हा मुंबई मराठी पत्रकार संघाने त्यांचा वार्तालाप आयोजित केला होता. पत्रकारांमध्ये काकासाहेबही आहेत हे पहाताच श्री. देवरस लगेच उठले आणि अक्षरशः काकासाहेबांच्या पाया पडले!

काकासाहेब हिंदुत्वनिष्ठ होते हे खरेच; पण म्हणून आधुनिक आचार-विचारांचे त्यांना वावडे नव्हते. त्यांच्या थोरल्या मुलीने घरी न सांगता परस्पर एका ख्रिश्चन तरुणाशी विवाह केला; पण ह्या विवाहाला काकासाहेबांचा मुळीच विरोध नव्हता व मागून नातेवाइकांना पत्रे पाठवून त्यांनी हा खुलासाही केला.

माटुंग्याचा श्रद्धानंद महिलाश्रम म्हणजे काकासाहेबांचे जिते-जागते स्मारक! काकासाहेबांनी समर्पित वृत्तीने केलेल्या समाजसेवेचे हा महिलाश्रम म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

# उत्पादनाची लक्ष्ये गाठा आणि ओलांडाही !

चालू आर्थिक वर्षातील आठ महिने आपल्या पाठीशी साक्षीरूपानं खडे आहेत. या आठ महिन्यात औद्योगिक वाढीचा सुमारे आठ टक्के वेग कायम ठेवण्यात आपणास यश मिळाले आहे, हे जाहीर करताना मला आनंद होत आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात अभूतपूर्व महापुरामुळे पूर्वेकडील राज्यांत, अनेक अडचणी निर्माण झाल्या आणि त्यामुळे उत्पादन विस्कळित झाले. तरीही आपणास हे यश मिळविणे शक्य झाले आहे, हे विशेष !

## आठ टक्के वाढीचा वेग गाठला !

कारखाने, खाणी आणि वीज-निर्माण केंद्रे येथील कामगार, व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक या यशाबद्दल प्रशंसेस पात्र आहेत.

चालू आर्थिक वर्षाचे पुढील चार महिने आपणासमोर आहेत. सर्वसाधारणपणे या चार महिन्यात, इतर कोणत्याही चार महिन्यांच्या तुलनेत अधिक उत्पादन होत असते. देशाच्या बहुतेक सर्व भागात हवामान आल्हाद-कारक आणि अधिक जोमानं काम करण्यास प्रवृत्त करणारे असते. त्याचप्रमाणे, आर्थिक वर्षाच्या समाप्तीबरोबर, आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अंदाजपत्रकी कमाल मर्यादा गाठण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येतो. प्रशासन, व्यवस्थापन, खाणी आणि वीज-निर्मिती केंद्रे, कारखाने आणि कार्यशाळा यात काम करणाऱ्या आपणापैकी प्रत्येकाने आपली लक्ष्ये ओलांडण्याचा निर्धाराने प्रयत्न केला तर कर्तव्यपूर्ति आणि यशाच्या समाधानाने आपण या वर्षास निरोप देऊ.

आपली विचारसरणी काय आहे अथवा आपली राजकीय मते काय आहेत, हा विचार सोडून, केवळ कमाल उत्पादन करूनच आपला देश संपन्न होऊ शकतो आणि आपण आपल्या देशातील आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित लोकांना अधिक चांगले जीवन देऊ शकतो, याबद्दल आपणा सर्वांचे एकमत आहेच. आपण शेतात आणि कारखान्यात अधिक उत्पादन करूनच राष्ट्र पुनर्निर्मितीच्या महान लढ्यात विजयी होऊ शकतो आणि त्या दृष्टीने सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता यासाठी आपण चालविलेला संघर्ष आपल्या मार्गात येता कामा नये.

उत्पादनाच्या चक्रांना सतत गतिमान ठेवणाऱ्या सर्व कामगारांना, व्यवस्थापकांना आणि कर्मचाऱ्यांना माझे असे कळकळीचे आवाहन आहे की, त्या सर्वांनी येत्या चार महिन्यात आपल्या परिश्रमांची पराकाष्ठा करून केवळ उत्पादनलक्ष्ये गाठून अथवा ओलांडून समाधान मानू नये तर या देशातील सामान्य लोकांच्या अधिक कल्याणासाठी आपल्या केंद्रातील उत्पादनक्षमतेचा कमाल उपयोग करावा.

**जॉर्ज फर्नांडिस**
उद्योग मंत्री

## उत्पादनकार्य चालू द्या

davp 78/ ( Marathi )

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरन्दरे

# चीन : द ग्रेवज् ऑफ् द वर्ल्ड आर फुल् ऑफ् इण्डिस्पेन्सेबल् पीपल् !

वल्लभभाई पटेलांनी स्वतःला अपर्यायी समजणाऱ्या नेत्यांबद्दल वरील उद्गार काढले होते. कोणावाचून काही अडत नाही. उलट मृत नेत्यांचीच काही काळात अडचण होते आणि मग त्यांच्या सत्यस्वरूपाचे दर्शन करायला (प्रसंगी चारित्र्यहननही करायला) सुरुवात होते. माओला मृत्यूत्तर सध्या वाईट दिवस आलेले दिसतात. त्याच्या मृत्यूनंतर लगेचच त्याच्या पत्नीसह असणाऱ्या चांडाळ-चौकडीवर प्रचंड टीकेचे मोहोळ उठले आणि या चांडाळचौकडीला तिच्या शांघायमधल्या पाठिराख्यांसह पूर्णतः नेस्तनाबूत करण्यात आले. तेव्हा या चांडाळचौकडीने माओचा विश्वासघात करून स्वतःच्या तुंबड्या भरल्या, असा आरोप ठेवून लोकांचा राग त्यांच्याकडे वळवण्यात आला होता. वस्तुतः पाश्चात्य तंत्रज्ञानाची आयात यांसारख्या गोष्टींमध्ये चांडाळचौकडी माओच्या क्रांतिकारी भमिकेला तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अधिक जवळची होती. त्या वेळी हुआ कुओ फेंग व त्याचे सत्ताधारी मंडळ मवाळ गटात मोडणारे होते. या चांडाळचौकडीच्या नाशाबरोबरच माओवरच्या सध्याच्या टीकेची बीजे पेरली गेली होती.

**तेंग सिआओ पेंग :** चीनचा सध्याचा उपपंतप्रधान पण वस्तुतः खरा पोलादी पुरुष तेंग सिआओ पेंग हा प्रामुख्याने या टीकेमागे असावा. चीनमध्ये भित्तिपत्रकांचे स्तोम मोठे आहे त्याचप्रमाणे 'पीपल्स डेली' 'क्वामिटांग डेली' यांमध्ये येणारे लेख व 'वाचकांची पत्रे' ही सरकारचे धोरण दर्शवतात. 'पीपल्स डेली'-मध्ये सात नोव्हेंबरला काओ–शेन–तुंग या सैनिकाचे पत्र आलेले आहे. त्यात सरकारी अधिकाऱ्यांच्या निवडणुका का होऊ नयेत, असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यामुळे लोकांच्या गरजा प्रतिबिंबित होऊन अधिक लोकनिष्ठ शासन येईल, असा त्याचा दावा आहे. हे फार महत्त्वाचे पत्र आहे. कारण सरकारने पूर्णपणे नियंत्रित केलेल्या प्रेसमध्ये असे पत्र येऊ शकणे ह्याचा अर्थ सरकारी धोरणच बदलत आहे. तेंग सिआओ पेंगच याच्या मागे असावा. १९७६ च्या दंगलीनंतर तेंग सिआओ पेंगची दुसऱ्यांदा उचलबांगडी झाली पहिली, सांस्कृतिक क्रांतीच्या वेळी झालेली होती. माओच्या मृत्यूनंतर तो परत उपपंतप्रधानपदावर आरूढ झाला. पहिल्या सांस्कृतिक क्रांतीत Let hundred flowers bloom ही प्रसिद्ध फसवी घोषणा करून माओने अनेक विचारवंतांना तुरुंगात डांबले. ही घोषणा तेव्हा त्यांना खरी वाटून त्यांनी सरकारवर टीका केलेली होती. टीकेचा रोख आपल्यावरच आहे, हे दिसल्यावर माओने शांतपणे त्यांना लेबर कॅम्पसवर पाठवून दिले. या सांस्कृतिक क्रांतीत बळी पडलेल्यांचे पुनर्वसन सुरू झाले आहे. माओवर सरळ आरोप करायला हलकेच सुरुवात झालेली आहे. सांस्कृतिक क्रांती चूकच होती, इथपासून ते १९६७ ची Great Leap Forward ही प्रत्यक्षात उडीही ठरली नाही न् पुढे तर गेली नाहीच नाही, हे मान्य करण्यात येत आहे. याबद्दल माओला जबाबदार धरण्यात येत आहे. देशात आर्थिक आघाडीवर गोंधळ निर्माण होण्यास माओची धोरणे कारणीभूत होती, असेही म्हटले आहे.

माओ ७० टक्के चांगला, ३० टक्के वाईट असे भित्तिपत्रकांत स्पष्ट म्हटलेले आढळते. १०० टक्के चांगुलपणापासून ७० टक्के चांगुलपणापर्यंत माओ उतरलेला आहे. स्वतः तेंग सिआओ पेंग माओ याहून 'थोडा चांगला' होता असे म्हणतो, तर स्वतःबद्दल त्याचे ६० : ४० असे विश्लेषण आहे ! या गोष्टी सविस्तरपणे देण्याचे कारण म्हणजे माओने देवाची जागा जी घेतली होती ती हळूहळू वितळत आहे. केवळ व्यक्तिहनन नव्हे, तर धोरणात मोठा बदल यात अभिप्रेत आहे.

**धोरणात बदल :** आधुनिकीकरणाचा मोठा प्रश्न सध्या चिनी नेत्यांना भेडसावत आहे. तेंग सिआओ पेंगच्या म्हणण्याप्रमाणे विज्ञान, उद्योगधंदे, तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय संरक्षण या चार प्रमुख शाखांमध्ये हे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी लोकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. आजही सामान्य चिनी माणसाला अन्न चांगले मिळू शकत नाही आणि किमान गरजा समाधानकारकरीत्या भागवता येत नाहीत. लोकांना आजवर प्रचंड दबावाखाली सोनेरी भविष्याची आमिषे दाखवून राबवण्यात आले. आता तसे करून चालणार नाही म्हणून वितरणव्यवस्थेपासून सर्व गोष्टी हळूहळू बदलण्यात येत आहेत. परवान्यांचे वाटप अधिक खुले करण्यात आले आहे. छोट्या दुकानांची मोठ्या प्रमाणावर स्थापना करण्यात येत आहे. ही सामूहिक तत्त्वावर चालवण्यात येतील. मोठ्या दुकानदारांकडून माल घेऊन तो रस्त्यावर सरळ विकता येईल, अशी सवलत विक्रेत्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे विक्री-व्यवस्था सुलभ होईल असा अंदाज आहे.

कारखान्यांचे व्यवस्थापन प्रथमच संपूर्णतः मॅनेजर्सच्या ताब्यात दिले आहे. आजवर स्वयंपूर्णतेवर भर देण्यात येत असे; म्हणजे प्रमुख उत्पादनाखेरीज इतरही उत्पादने वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात व्हावीत अशी अपेक्षा होती. आता विशिष्ट एखाद्याच उत्पादनात Speedalization करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे एकूण औद्योगीकरणालाही वेग येईल.

**अमेरिकेशी संधान :** चीनच्या परराष्ट्रीय धोरणात माओनेच जो बदल केला तो अधिक उत्साहाने अंमलात येत आहे. Robert Novak या अमेरिकन पत्रकाराला तेंगने दिलेली मुलाखत फार महत्त्वाची आहे. वेळ पडल्यास शस्त्रास्त्रांच्या बाबतीतही अमेरिकेशी सहकार्य करून रशियाला शह देण्याची चीनची इच्छा आहे. रशिया हा अमेरिकेहून भयानक

स्टेट बँकेतर्फे मार्गदर्शन......




तुमच्या समस्या आम्हाला सांगा. तुमची स्वप्नंही सांगा. आमच्या अनेक योजनांतर्फे तुम्हाला मदत मिळेल.

एक ना दोन! अनेक योजना! बोनस वाढवणाऱ्या, मासिक मिळकतीत भर घालणाऱ्या, कायम स्वरूपाची पेन्शन देणाऱ्या, तुमच्या पैशांची बचत करणाऱ्या, तुम्हाला पैसा मिळवून देणाऱ्या योजना... अशा नाना प्रकारच्या योजना.

वानगीदाखल पहा...... दरमहा ६० रुपयांची बचत करून दहा वर्षात रु. ११,६५३.८० देणारी योजना! शिवाय व्याजापोटी मिळणारे तुमचे वार्षिक ३००० रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त!

स्टेट बँकेत आम्ही या योजनेला म्हणतो — रिकरिंग डिपॉझिट योजना. हवं असेल तर तुम्हीही तुमच्या आवडीचे नांव द्या... "लाडक्या लेकीच्या लग्नासाठी बचत योजना!"

भारताची मोठ्यात मोठी बँक असल्यामुळे, स्टेट बँक तुम्हाला अधिक सुखसोयी देऊ शकते. देशभर पसरलेल्या तिच्या ४,८०० हून अधिक कार्यालयांपैकी एकादे तरी तुमच्या जवळपास असणारच.

तुमचा पैसा बिलकुल सुरक्षित. कारण स्टेट बँकेचे भांडवल आणि गंगाजळी मिळून १२४ कोटी रुपये होतात. अर्थातच तुमच्या गुंतवणुकीला काडीचाही धक्का लागणार नाही.

**स्टेट बँक**

**आमचा अगदी विनामूल्य सल्ला!**
**त्याचा अवश्य लाभ घ्या आणि पैशात भर घाला.**

CHAITRA SBI 407 MAR


शत्रू आहे असे माओचे मत होतेच, तेच पुढे चालवण्यात आले आहे. विएतनामशी युद्ध, त्यांचा रशियावरील विश्वास या प्रमुख कारणास्तव चालू आहे, हो चि मिन्ह जिवंत होता तोपर्यंत अमेरिकेविरुद्ध त्याने चीनची मदत घेतली; पण नंतर परिस्थिती झपाट्याने बदलली.

चिलीसारख्या देशात जिथे लष्करी सत्ता आहे तिथेही चीन सत्तेला पाठिंबा देत आहे. नुकताच चिलीचा परराष्ट्रमंत्री पेकिंगला भेट देऊन गेला.

रशियाच्याविरुद्ध म्हणून रुमानियाच्या चॉसेस्क्यूशी चीनचे संबंध सुधारले आहेतच.

भारतही रशियाच्या दडपणाखाली आजवर असल्याने संबंध सुधारण्याच्या आमच्या आवाहनाला अजून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, असे चीनचे म्हणणे आहे.

अमेरिकेशी व युरोपशी मोठ्या प्रमाणावर व्यापारी करारांचे सत्र सध्या चालू आहे. फक्त ब्रिटनशीच आता हॅरिअर जेट विमाने आणि अवजड यंत्रसामुग्रीचा ५०० कोटी पौंडांचा व्यवहार चीनने केलेला आहे. फ्रान्स हा विमाने व शस्त्रास्त्रे देणाऱ्यांतील दुसरा महत्त्वाचा देश आहे.

**अन्तर्गत परिस्थिती :** लेखाच्या सुरुवातीला उल्लेखल्याप्रमाणे भित्तिपत्रकात माओंवर हल्ले सुरू झालेले आहेत. या भिंतींना 'Democratic walls' म्हणून संबोधण्यात येते. निवडणुकांची मागणी करणाऱ्या पत्रावर वाचकांच्या प्रतिक्रिया मागवण्यात आलेल्या आहेत. या दरम्यानच तेंग सिआओ पेंगची लोकप्रियता शिगेला पोचली आहे. रॉबर्ट नोवाकला दिलेल्या मुलाखतीत त्याने म्हटले आहे की, मला पंतप्रधानपद स्वीकारण्याची विनंती करण्यात आली होती; पण मी वयोमानामुळे ते स्वीकारू इच्छित नाही. ही विनंती नुकत्याच झालेल्या कॉंग्रेसमध्ये करण्यात आली असावी. देशभरही भित्तिपत्रकांत त्याला पंतप्रधान करण्याची मागणी होत आहे. हुआ कुओ फेंग हा जरी अध्यक्ष असला तरी खरी सत्ता याच्याच हातात आहे आणि राहणार.

आपल्याच जुन्या धोरणांच्या सूचनांबद्दल तेंग सिआओची दोन वेळा हकालपट्टी करण्यात आली होती. या वेळी मात्र त्या तपश्चर्येचे फळ त्याला मिळणार असे दिसते. त्याचबरोबर अधिक मुक्त समाजव्यवस्थेकडे चिनी जनतेची वाटचाल सुरू झालेली दिसते. राज्यकर्त्यांना परवडेल एवढेच स्वातंत्र्य (म्हणजे पारतंत्र्यच) कम्युनिस्ट देशात लोकांना बहाल करण्यात येते, हे लक्षात घेता चीनमधले सध्याचे वारे जरा गोंधळात टाकणारे आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. □ [दि. १४-१२-७८]

'मी बर्लीनवर बॉम्बर्स नेऊन हल्ला करून दाखवतो,' असे पहिल्या महायुद्धकाळात ब्रिटिश सेनापतीसमोर बेधडक सांगणारा रत्नागिरीचा दत्तू पटवर्धन! त्याची ही हकीकत रत्नागिरीचे श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी परिश्रमपूर्वक माहिती जमवून येथे वाचकांना सादर केली आहे–एका अज्ञात वीराची स्मृती निदान शब्दरूपाने तरी कायम रहावी म्हणून! पहिल्या महायुद्धकाळापूर्वीची ही हकीकत असली तरी आजही ती ताजी व प्रेरक वाटल्यावाचून राहणार नाही.

# वीरगाथा : रत्नागिरीच्या डी. लॅकमन पॅटची

'ऊठ! चालता हो घरातून! पानाला शिवू नको!! ऐतखाऊ, उनाड, मवाली लेकाचा!' खालच्या आळीतले नाना ओरडले. तो आवाज आजूबाजूच्या पाच-सात घरी स्पष्ट ऐकू गेला.

'आज पुन्हा पोरानं म्हाताऱ्याचं डोकं फिरवलं वाटतं!' शेजारचे दादा सावंत म्हणाले. ते आणि शेजारचे दोघे-तिघे बाहेर येत आहेत, तोवर १९–२० वर्षांचा, निळ्या डोळ्यांचा, गोरापान, लालबुंद चेहऱ्यानं आणि दाणदाण पाय आपटीत तो मुलगा कोपऱ्यावरच्या मुरलीधराच्या देवळापर्यंत पोचलाच. जाताना त्याचे एवढेच शब्द ऐकू आले –

'नाना! कलेक्टरसारखे हजार रुपये मिळवीन तेव्हाच घरी येईन.! तोवर येणार नाही!'

ते तरणबांड पोर एवढं बोलूनच थांबलं नाही, तडक गाठलं त्यानं आगाशे, केळकर, भाऊ परांजप्यांचं घर! त्यांच्याकडून १०-१५ रुपये जमा केलेन्. निघाला कोल्हापूरकडे पायी! वाहनानं जायला तेवढे पैसे पुरले नसते म्हणून दररोज १०–१०, १५-१५ मैल चालत जाऊन त्यानं कोल्हापूर गाठलं. खरं तर त्याला बोटीनंच जायचं होतं मुंबईला; पण पावसाळा तोंडावर आलेला, त्यामुळं बोटी बंद झालेल्या, म्हणून कोल्हापूर गाठलं! मुंबईपर्यंत रेल्वेनं प्रत्येक तिकिट-चेकरला चुकवीत, विनातिकिट प्रवास पूर्ण केला आणि मुंबईत मसजिद बंदरवर हा रत्नागिरीचा नाना पटवर्धनांचा थोरला मुलगा खिशात चार आणे घेऊन उतरला!

ते साल होतं १९०४!

जुन्या बाराबंदी संस्कृतीनं विलायती बूट-पाटलोण संस्कृतीला रत्नागिरीच्याच एका पगडीधारी बाळानं आव्हान देऊन लोकांची अस्मिता जागी करण्याचा चंग बांधला होता. लॉर्ड कर्झनची नेहमीची मुदत संपल्यानं तो विलायतेला परत गेला होता; परंतु त्याची मुदत आणखी दोन वर्षांनी वाढविल्यानं तो फिरून हिंदुस्थानात आला. थोड्याच दिवसांत इंग्रज सेनानी, लॉर्ड किचनेरबरोबर वितुष्ट आल्यानं त्याला राजीनामा देऊन निघून जावं लागलं! त्याची जागा लॉर्ड मिंटोनं घेतली!

याच वेळी विलायतेत हुजूर पक्षाच्या प्रधानमंडळाचा पराभव होऊन उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ झाला. तिकडे रशिया आणि जपान यांच्यात युद्ध होऊन जपान या आशियातील चिमुकल्या राष्ट्रानं युरोपातील एका प्रबळ राष्ट्राचा पराभव केला. या कृत्यामुळं आशिया खंडात जागृतीची नवी चिन्हं स्पष्ट दिसू लागली. याच वेळी हिंदुस्थानातील सुशिक्षितांत दोन पक्ष उत्पन्न झाले. त्यातील एक नेमस्त नि दुसरा जहाल. या जहाल मतवादी तरुणांना कर्तबगारीची नवी नवी क्षेत्रं शोधण्याची आस लागली. त्याचीच लागण रत्नागिरीहून पित्यानं जेवणाच्या पानावरून उठवून लावलेल्या आणि तडक मुंबई गाठलेल्या तरुणालाही लागली.

काही तरी नवं करायचं, नव्या क्षेत्रात उतरून पराक्रम गाजवायचा, वडिलांना दिलेल्या आव्हानाचं स्मरण ठेवून पैसे मिळवायचे, या ध्येयानं त्यानं वाडीबंदरच्या रेल्वे-यार्डमध्ये दरमहा पंचवीस रुपये पगारावर गुड्स्क्लार्क म्हणून नोकरी पत्करली. गिरगावातील बाळाभाऊ गोडबोले हे नाना पटवर्धनांचे जिवश्च कंठश्च मित्र. त्यांना त्यांच्या मित्राच्या या तरुण पोरानं सारी हकीकत सांगितली. बाळाभाऊंनी त्याला आपल्याकडे ठेवून घेतलं नि ही गुड्स्क्लार्कची नोकरी सुद्धा मिळवून दिली.

तो दररोज अँग्लो–इंडियन्स, ख्रिश्चन आणि पारशी स्टोकर्स हे रेल्वे-ड्रायव्हर्स बनून इंजिन चालवून कसे लठ्ठ पगार मिळवितात हे दृश्य पहात असे. आपणही त्यांच्यासारखं व्हावं, असा विचार त्याच्या मनात सदैव येत असे. या विचारान अंतर्बाह्य भारून जाऊन त्यानं संपूर्णपणे इंग्रजी पोशाखाचा स्वीकार केला आणि त्या वेळच्या बी. बी. अँड सी. आय. रेल्वेच्या माटुंगा येथील वर्कशॉपमध्ये जाऊन मुख्य इंग्रज इंजिनियरची-जे. स्मिथची-भेट घेतली. त्यान सांगितल की, 'येत्या रविवारी अगदी सकाळी तू माझ्या घरी ये आणि मी जे काम सांगेन ते मला करून दाखीव, म्हणजे तू निश्चित नाव काढशील!'

ठरल्याप्रमाणे हा रत्नागिरीचा महत्त्वाकांक्षी तरुण त्या साहेबाच्या घरी गेला. स्मिथसाहेबांनी त्याच्या हातात एक गवती बॅग आणि दहा रुपये दिले आणि एक पौंड बकऱ्याचं मांस आणण्यास सांगितलं. ते आणल्यावर त्या ब्राह्मण तरुणाला–'मी सांगतो तसे शिजवून

घाल ' असंही सांगितलं. या तरुणानं मागचा-पुढचा कसलाही विचार न करता केवळ महत्त्वाकांक्षा धरून नवीन क्षेत्र मिळविण्याची संधी हुकू नये म्हणन स्मिथसाहेबांना ते मांस शिजवून खाऊ घातलं ! स्मिथसाहेब खूष झाला आणि त्यानं त्या तरुणाचं नवीन बारसं केलं– ' डी. लॅकमन-पॅट '. ' दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धन ' या भारतीय ब्राह्मणी नावाचं इंग्रजीकरण झालं !

आणि हे नाव त्याचे भेदक निळे डोळे, पिंगट कुरळे केस आणि किंचित् गोरापान तांबूस रंग या रूपसंपदेमुळं त्याला फिट्ट बसलं ! तो अँग्लो–इंडियन म्हणून सहज गणला जाऊ लागला !

या नामांतरामुळंच त्याला खडकपूर रेल्वे–यार्डामध्ये वर्षभर शिक्षणाकरिता पाठविण्यात आलं. शिक्षणक्रम संपवून मुंबईला परतल्यावर स्मिथसाहेबांनी त्याला एका लोकलगाडीवर प्रथम फायरमन म्हणून काम दिलं. दोनच वर्षांच्या कालावधीत तो इंजिन ड्रायव्हर बनून अँग्लो–इंडियन ड्रायव्हरसारखा ५०० रुपये पगार मिळवू लागला ! १९०७–०८ या सालात वडिलांना दिलेल्या आव्हानातील अर्ध आव्हान त्याला पूर्ण करता आलं. दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धनाचा ' डी. लॅकमन पॅट ' बनून !

पण ' डी. लॅकमन पॅट 'ना नुसतं इंजिन–ड्रायव्हर होऊन गप्प बसायचं नव्हतं. त्यांचं अतिमहत्त्वाकांक्षी मन गप्प बसू देईना ! लहानपणी रत्नागिरी बंदरात मुंबईहून येणाऱ्या बोटी त्यांनी पाहिल्या होत्या. सागरावर डौलानं पाणी कापीत येणाऱ्या बोटीचं आकर्षण त्यांना होतं. त्या बोटीचा कॅप्टन होऊन सागरावर विजयी वीराप्रमाणं फिरण्याची त्यांची सुप्त इच्छा आता उफाळून आली ! एवीतेवी नावानं ते अँग्लो-इंडियन बनलेच होते. त्यामुळं परदेशी जाऊन मरीन इंजिनियर किंवा बोटीचा कॅप्टन होण्याच्या ईर्षेने त्यांनी प्रसंगी विनातिकिट नि विनापरवाना परदेशी पळून जाऊन मरीन इंजिनियरिंगचं शिक्षण घेण्याचा संकल्प सोडला !

जे–स्मिथ या इंग्रज इंजिनियरच्या साहाय्यानं रेल्वे–इंजिन-ड्रायव्हर म्हणून काम सुरू केलं. त्याप्रमाणंच माटुंग्याच्या रेल्वे वर्कशॉपमधील के. जोडल् नावाच्या जर्मन फोरमनच्या सख्ख्या भावाबरोबर – हेन्रिचबरोबर– सूत जमविलं ! हेन्रिच ' ट्रॅटॅन्स फेल्स ' ह्या हॅंबुर्गला जाणाऱ्या व्यापारी बोटीवर मुख्य इंजिनियर होता. त्या बोटीच्या त्यानंतरच्या दुसऱ्या फेरीच्या वेळी A Soow Away Boy–एक भुरटा आदमी–म्हणून बोटीवर संध्याकाळी विनातिकिट नि विनापासपोर्ट प्रवेश केला. हेन्रिचनं पॅटना बोटीच्या कोलचेंबरमध्ये बसवून ठेवलं आणि योग्य संधी साधून रात्री बोटीच्या कॅप्टनला – एमिटला. ही गोष्ट सांगितली. त्याचा प्रथम या गोष्टीवर विश्वासच बसेना. त्यानं आश्चर्यानंच आमच्या डी लॅकमनना ' तू येथे कसा आलास ? का आलास ? ' असं विचारलं. पॅटनी कॅप्टन एमिटला बेडरपणे उत्तर दिलं– ' सर ! मी इंग्रज सरकारच्या विरुद्ध चळवळ करणाऱ्या पार्टीचा असल्यामुळं मला जर्मनीला जाण्याकरिता पासपोर्ट नि तिकिट मिळेना, त्यामुळं मला ह्या मार्गानं यावं लागलं ! ' पॅटनी एवढं सांगून न थांबता आपली सारी सर्टिफिकेट्स् त्यांना दाखविली ! आणि वर सांगितलं– ' सर ! तुम्हाला वाटलं तर समुद्रात टाकून द्या–नाही तर जर्मनीला न्या ! मी तुमच्या बोटीवर द्याल ते काम करायला तयार आहे ! '

कॅप्टन एमिट या निर्भीड उत्तरानं नि निर्धारानं भारावून गेले साहसी माणसाची नाडी साहसी माणसानं बरोबर ओळखली नि कॅप्टननी बोटीच्या चीफ् ऑफिसरला फर्माविलं की, ' ह्या माणसाला जेवण द्या आणि खलाशाचा पोशाख देऊन उद्यापासून स्टोकरचं– म्हणजेच बॉयलरमध्ये दगडी कोळसे टाकण्याचं काम द्या ! ' हे काम डी लॅकमननी अतीव उत्साहानं केलं ! सतत चार दिवस त्यांचं हे उत्साही नि उत्स्फूर्त काम पाहून कॅप्टननी त्यांना इंजिनरूममध्ये ग्रीझरचं काम दिलं !

अखेर एकदाचं हॅंबुर्ग आलं !

रत्नागिरीच्या खालच्या आळीतील घरातून जेवणाच्या पानावरून उठून ' हजार रुपये मिळवीन ! ' या जिद्दीनं बाहेर पडलेल्या दत्तात्रयानं हॅंबुर्ग गाठलं ! हॅंबुर्गला उतरताच तो कॅप्टन एमिटचा ' पाहुणा ' झाला ! कॅप्टन एमिटनी त्याचं धैर्य नि विलक्षण धाडस यांची कथा मुख्य नाविक अधिकाऱ्याला सांगितली. ती ऐकून तो मुख्याधिकारी अवाक् झाला. त्यांनीच प्रयत्न करून पॅटना जर्मन नागरिकत्व दिलं ! पॅट यांची अतीव महत्त्वाकांक्षा नि तीव्र इच्छा ओळखून त्यांना हॅंबुर्गच्या मरीन इंजिनियरिंग स्कूलमध्ये प्रवेश देवविला. त्याचबरोबर त्यांना स्टायपेंड मिळू लागला. त्यामुळं पॅटना अभ्यासक्रम पूर्ण करण्याव्यतिरिक्त कोणतीच काळजी उरली नाही. रत्नागिरीच्या एका ' दत्तात्रया 'चं ' पुरुषस्य भाग्यम् ' जर्मनीतील हॅंबुर्ग शहरात असं उदयाला आलं !

तिथं दोन वर्षांचा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला. रत्नागिरीत त्या वेळच्या इंग्रजी पाचव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलेल्या पटवर्धनांनी १९०९ साली हॅंबुर्गमध्ये मरीन इंजिनियरिंगचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. ही विलक्षण भरारी आताच्या सर्व सुखसोयी असलेल्या विद्यार्थ्यांमधून किती विद्यार्थी मरीन इंजिनियरिंगचा साहसी अभ्यासक्रम पूर्ण करतात, या पार्श्वभूमीवर आजही किती ठळकपणानं उठून दिसते !

डी लॅकमन पॅट यापुढं करणार असलेल्या पराक्रमाची ही नांदीच ठरली !

हॅंबुर्गचा शिक्षणक्रम पूर्ण होताच पॅटचं लक्ष ग्लासगोच्या मरीन इंजिनियरिंग सर्टिफिकेट कोर्सकडे गेलं ! कारण त्या काळात ग्लासगोला मिळणाऱ्या सर्टिफिकेटला जगात फार मोठा मान होता ! पंचवीस वर्षांच्या पॅटनी ग्लासगोच्या नॉटिकल स्कूलमध्ये दोनच वर्षांत मरीन इंजिन अटेंडंटचा कोर्स आणि कोस्टल नॅव्हिगेशनचा कोर्स पूर्ण केला !

हे दोन्ही कोर्स पूर्ण केल्यानंतर त्यांचं लक्ष ' लिव्हरपूल 'कडे गेलं! लिव्हरपूल ते न्यूयॉर्कपर्यंत फेऱ्या करणाऱ्या ' ओशियानिक ' या बोटीवर त्यांना आवर्जून नि मोठ्या सन्मानानं घेतलं गेलं !

१९०९ ते १९११ ही दोन वर्षं ग्लासगोमध्ये कोर्स पूर्ण करण्यात गेली. पुढील दोन वर्षांत ' ओशियानिक 'नं त्यांना एक यशस्वी बोट-कप्तान म्हणून नाव मिळवून दिलं !

या वेळी त्यांना ' डी लॅकमन पॅट ' हे नामकरण करणारा जे. स्मिथ आठवला नि त्यांचे गुण हेरून हॅंबुर्गमध्ये प्रवेश मिळवून देणारा हेन्रिच आठवला !

या वेळपर्यंत त्यांची महिन्याची मिळकत हजार रुपयांवर गेली

होती. वडिलांचं आव्हान पूर्ण करण्याची वेळ आली होती. त्या एकाच कारणासाठी 'दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धनां'ना भारतात येण्याची ओढ लागली. 'ओशियाटिक' बोटीवरील नोकरीमुळं जगभरच्या बोट–कप्तानांशी त्यांच्या ओळखी झाल्या–दाट स्नेह जमला !

दोनच वर्षांत म्हणजे १९१३ साली कॅप्टन हॅरी या इंग्लिश कॅप्टनच्या मदतीने त्यांनी मुंबई गाठली. मुंबईच्या बंदरात पाऊल टाकताच त्यांना आठवला कॅप्टन हेन्रिच आणि त्याची ती जर्मन बोट ट्रँटेन्स-फेल्स ! मुंबई बंदरात येताच माटुंगा येथील वर्कशॉपमधील जे. स्मिथ आठवला ! तो मायदेशी जाऊन एक वर्ष झालं होतं ! रेल्वेच्या इंजिनातून आपण बोटीच्या इंजिन-रूममध्ये कॅप्टन म्हणून सीमोल्लंघन कसं केलं याचा धावता पट पॅटच्या डोळ्यांपुढून क्षणभरच सरकला ! दृष्टीसमोर आलं रत्नागिरी बंदर ! पॅटची पुढची झेप सुरू झाली ! मुंबईच्या 'इंडियन को ऑपरेटिव्ह नॅव्हिगेशन कंपनी'ची नवी कोरी बोट 'एस्. एस्. तुकाराम' मुंबईच्या समुद्रातून रत्नागिरीकडे जाणार असल्याची बातमी लागली ! इथे पॅटना ग्लासगोच्या त्या जगन्मान्य मरीन इंजिन कोर्सच्या-कोस्ल नॅव्हिगेशन कोर्सच्या सर्टिफिकेटचा योग्य उपयोग करता आला. ! ती नवी कोरीकरकरीत 'एस्. एस्. तुकाराम' ही बोट रत्नागिरीला नेण्याचा मान कॅप्टन म्हणून त्यांना मिळाला !–खालच्या आळीतील लखूनाना पटवर्धनांच्या जेवणाच्या पानावरून उठून गेलेल्या दत्तूला पहायला तिन्ही आळ्यांतील लोक,–वरची आळी-मधली आळी (टिळक आळी) नि खालची आळी–बंदरावर गर्दी करून आले !

एस्. एस्. तुकाराम बोट समुद्रात दिसू लागली. हळूहळू पण मोठ्या दिमाखानं तिनं बंदरात प्रवेश केला. बोटीनं नांगर टाकल्याचा आवाज झाला नि एक इंग्लिश पांढऱ्यासफेद पोशाखातील युरोपियन कॅप्टन पडावात उतरलेला लोकांनी पाहिला ! दत्तूला पहायला आलेल्या लोकांची निराशा झाली ! त्यांच्या डोळ्यांसमोर काच्याचं धोतर मारलेल्या–निदान बंदरात प्रवेश करताना तरी–दत्तूची ब्राह्मणी मूर्ती दिसणार असं वाटत होतं; पण निघाला सफेद अर्धी चड्डी, अर्धा इंग्रजी शर्ट नि सफेद लष्करी टोपी घातलेला एक युरोपियन कॅप्टन ! पण लोकांना तोही पहायचाच होता, त्याचंही कुतूहल होतं त्यांना !

पडाव धक्क्याला लागला. अत्यंत चपळाईनं तो युरोपियन उतरला नि धावतच भाऊ परांजप्यांच्या पायांवर डोकं ठेवून त्यानं नमस्कार घातला ! लोकांना हे आक्रीतच पहायला मिळालं ! एक युरोपियन कप्तान एका धोतरवाल्या ब्राह्मणाला साष्टांग नमस्कार घालतोय ! पण दुसऱ्याच क्षणी त्या कप्तानानं मान वर केली नि साऱ्यांच्याच तोंडून प्रेमानं शब्द बाहेर पडले–

'अरे ! हा तर लखूनानांचा दत्तू !'

होय, तो युरोपियन कॅप्टन 'डी लॅकमन पॅट' हा लखुनाना पटवर्धनांचा थोरला मुलगा 'दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धन !'–तो मनस्वी उनाडपणा करणारा, बिळात घुसणाऱ्या सापाला बाहेर काढून नुसत्या मुटक्यान ठेचणारा नि शाळेत जातो असं सांगून दालदी मच्छीमारी लोकांबरोबर दूर समुद्रात मासे मारण्यास जाणारा, पोहायला जाणारा उनाड समजला गेलेला 'दत्तू' होता !

'दत्त्या ! तुला पोट भरण्याकरता लोकांच्या म्हशी धुवाव्या लागतील !' असं वडिलांकडून रागावून घेणारा आणि त्यांना 'नाना, मी काय म्हणून लोकांच्या म्हशी धुऊन देईन ? मी तर मशीन्स चालवीन !' असं धीटपणाचं पण त्या काळात उद्धट समजलं जाणारं उत्तर देणारा दत्तू होता ! ह्या दत्त्याला मुंबईला पाठवून द्या ! चालवू दे मशीन्स कोठली चालवतो ती !' असा लखूनानांना लोक देत असलेला सल्ला ऐकणारा 'दत्तू' होता ! ! !

भाऊ परांजप्यांना नमस्कार केल्यानंतर, दत्तू त्याच्यासाठी आणलेल्या एका सुशोभित धमणीतून (दोन बैलांची कापडी आच्छादित सारवटगाडी) खालच्या आळीत आपल्या घरी आला नि त्यानं आपल्या वडिलांच्या–लखूनानांच्या, पायाशी स्वकष्टानं सागरपार-जाऊन मिळवून आणलेले हजारो रुपये–अक्षरशः हजारो राणी छाप रुपये–ओतले नि तो हात जोडून खाली वाकला ! लखूनानांनी त्याला मोठ्या प्रेमानं पोटाशी धरून त्याच्यावर आनंदाश्रूंची धार धरली ! 'दत्ताला' कृतार्थ वाटलं ! आता खरोखरीच दत्तूची महत्त्वाकांक्षा पुष्कळशी साध्य झाली होती. त्यामुळं पुढील दोन वर्षं म्हणजे १९१३ नि १९१४ सालं त्यांनी इथेच काढली. मुंबईला पळून जाण्यापूर्वीच त्यांचं लग्न झालं होतं. सुखाचा संसार नुकता कुठे सुरू झाला होता...

तेवढ्यात.........

तेवढ्यात त्यांच्या वडिलांचं निधन झालं ! काही दिवसांनीच सहा दिवसांच्या बाबाला सोडून त्यांची पत्नीही निवर्तली ! दत्तोपंतांच्या भावजीवनावर झालेले हे दोन आघात त्यांना रत्नागिरीस बसू देईनात. लहानग्या बाबाला–परशुरामाला–आपल्या आईच्या पदरात घालून दत्तोपंत मुंबई गाठून इंग्लंडला निघून गेले !

डी लॅकमन पॅट पुन्हा परदेशी गेला !

ग्लासगोचा मरीन इंजिन अटेंडंट कोर्स नि कोस्टल नॅव्हिगेशन कोर्सचं सर्टिफिकेट नि तीन वर्षांचा बोटीवरील प्रत्यक्ष कामाचा अनुभव या जोरावर 'एस्. एस्. ग्रेब' या इंग्लिश बोटीवर असिस्टंट मरीन इंजिनिअरचं काम त्यांना शोधत आलं ! पण दत्तू केवळ मरीन इंजिनियर म्हणून नोकरी करून आयुष्य घालविण्यासाठी जन्मला नव्हता ! नियतीच्या मनात त्याला पंचमहाभूतांपैकी आणखी एका महाभूतावर स्वार करायचं होतं !

'एस्. एस्. ग्रेब' वरील नोकरी सुरू होताच तीनच महिन्यांनी म्हणजे ऑगस्ट १९१४ मध्ये इंग्लंडचं जर्मनीबरोबर महायुद्ध– पहिलं जागतिक महायुद्ध सुरू झाले ! नवीन नवीन क्षेत्रात पराक्रम गाजवावा, या महत्त्वाकांक्षेनं दत्तूनं बोटीवरील नोकरी सोडली नि त्यांनी इंग्लंडच्या वॉर ऑफिसकडे नेव्ही किंवा आर्मीमध्ये प्रवेश मिळावा म्हणून अर्ज केला; परंतु केवळ एक भारतीय म्हणून त्यांना नकार मिळाला; पण हा नकार क्षणिक होता ! महायुद्धाची तीव्रता वाढू लागल्यानंतर अत्यंत बळकट नि धाडसी माणसांची वाण पडू लागली. या संधीचा फायदा न घेतील तर ते दत्तोपंत कसले ! त्यांनी ब्रिटिश

**... अक्षरशः हजारो राणी छाप रुपये ओतले नि तो हात जोडून खाली वाकला !**

ॲम्ब्युलन्स कोअरमध्ये भरती होण्यासाठी अर्ज केला ! अशा माणसांची वाण भासणाऱ्या ब्रिटिश लष्करी खात्याला त्यांचा अर्ज मंजूर करावाच लागला. त्यांची निवड नटेले आणि ब्रायटन येथील हॉस्पिटल्स्‌मध्ये ॲम्ब्युलन्सच्या कामासंबंधीच्या शिक्षणासाठी झाली.

घरातून हजार रुपये मिळविण्याची प्रतिज्ञा करून बाहेर पडणाऱ्या एका तरुणानं– रेल्वेइंजिन-ड्रायव्हर, बोटीचा कप्तान, मरीन इंजिनियर ही कामे यशस्वीरीत्या पूर्ण करून युद्धभूमीवरील रुग्णाइतांची शुश्रूषा करण्याचं शिक्षण इंग्लंडसारख्या देशात घेतलं ! सारंच विलक्षण ! दत्तोपंतांच्या आयुष्याला इथेच गती प्राप्त झाली ! शिक्षण पूर्ण होताच त्यांची रवानगी बेल्जियमच्या रणकंदनाकडे करण्यात आली ! तेथे काही ब्रिटिश युनिटस्‌ काम करीत होत्या. त्या ठिकाणी पॅटना मेलेले नि जखमी सैनिक रणांगणावरून घेऊन जाणं, त्यांना प्राथमिक उपचार देणं, त्यांचे बँडेज बांधणं, त्यांच्या मोटारी चालविणं अशा प्रकारची जी पडतील ती सर्व कामं त्यांना अंग मोडून नि झटपट करावी लागत. या सर्व कामातील तडफ नि पद्धतशीरपणा पाहून त्यांचे वरिष्ठ ब्रिटिश अधिकारी इतके प्रभावित झाले की त्यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पटवर्धनांना ताबडतोब कॉंपोनंट फोर्सिसमध्ये दाखल करावं, अशा शिफारशीवर शिफारशी केल्या. या शिफारशींमुळं वॉर ऑफिसरनं त्यांना बोलाविलं आणि फायरिंग कोर्सेसमध्ये घेण्याची मेहरबानी दाखवली; पण स्वाभिमानी डी लॅकमनने त्यांना निर्भयपणे सांगितलं की, 'फक्त ब्रिटिश पलटणीतच काम करण्यास आपण तयार आहोत !' त्यांचा निर्भीडपणा नि रुबाबदारपणा पाहून त्यांना ससेक्स जिल्ह्यातील ब्लेडफोर्ड ग्रावी एक सरकारी शिपाई म्हणून 'ससेक्स योमेनरी रेजिमेंट'मध्ये भरती केलं गेलं ! ते साल होतं १९१५ नि त्यांचा रिक्रूटिंग नंबर होता १७०२३३ ! आवश्यक ते जुजबी सैनिकी शिक्षण पूर्ण होताच एक सैनिक म्हणून त्यांची फ्रान्सच्या रणभूमीवर रवानगी करण्यात आली. त्यातही त्यांची तडफ नि हुषारी दिसून आल्यामुळे त्यांना त्यांच्याच रेजिमेंटमध्ये मशिनगन सेक्शनला घेतलं गेलं ! वयाच्या ३१ व्या वर्षी संपूर्ण ब्रिटिश रेजिमेंट असलेल्या या मशिनगन सेक्शनला एका भारतीयाची– रत्नागिरीच्या एका कोकणी ब्राह्मणाची निवड झाली होती !

महायुद्धाची तत्कालीन परिस्थिती अशी होती !

एक जुलै एकोणिसशेचौदा या दिवशी 'पँथर' नावाची जर्मन युद्धनौका मोरोक्कोच्या आदागीर बंदरात येऊन उभी राहिली नि पहिल्या महायुद्धाची ठिणगी फुलू लागली !

केवळ फ्रान्सच नव्हे तर युरोपमधील अनेक लहान–मोठे देश थरकले. जर्मनी साऱ्या युरोपशी मुकाबला द्यायला सिद्ध झाला आहे, याची ती नांदी होती ! अशा परिस्थितीत फ्रान्स एकाकी नाही, याची जाणीव करून देण्यासाठी ब्रिटनचा तेव्हाचा अर्थमंत्री लॉइड जॉर्ज यानं जाहीर केलं– 'जर्मनीनं फ्रान्सवर आक्रमण केलं तर आम्ही फ्रान्सच्या बाजूनं उभं राहू हे कैसरनं ध्यानात घ्यावं !' आणि याच घोषणेबरोबर ब्रिटन पहिल्या जागतिक महायुद्धात ओढला गेला !

त्याआधी अठ्ठावीस जून एकोणिसशेचौदामध्ये बोस्नियाच्या दौऱ्यावर असलेल्या ऑस्ट्रिया–हंगेरीच्या सिंहासनाचा वारस राजपुत्र फ्रान्सिस फर्डिनंड याचा खून झाला. या खुनामागे सर्बियन सरकारचा हात असला पाहिजे, अशी ऑस्ट्रिया–हंगेरीनं सोईस्कर समजूत करून घेतली होती आणि ही संधी साधून आपल्या साम्राज्याविरुद्ध असंतोष भडकविणाऱ्या स्लव्हवंशाच्या लोकांना धडा शिकवायचं त्यांनी ठरविलं ! त्याप्रमाणे अठ्ठावीस जुलै एकोणिसशे चौदा रोजी ऑस्ट्रिया–हंगेरीनं चिमुकल्या सैबेरियाविरुद्ध युद्ध पुकारलं ! याचवेळी आपलं राष्ट्रीय अस्तित्व सिद्ध करण्यास अनेक लहान युरोपीय देश उत्सुक झाले होते. त्यामुळे रशियानं ऑस्ट्रिया–हंगेरीच्या सीमेवर सैन्याची जमवाजमव सुरू केली लागलीच जर्मनीनं या सीमेवरील सैन्य काढून घेण्यास रशियाला बजावलं. रशियाच्या नकारामुळं जर्मनीनं एक ऑगस्टला रशियाविरुद्ध युद्ध पुकारलं ! त्याचबरोबर जर्मनीनं फ्रान्सलाही– 'या संघर्षामध्ये फ्रान्स तटस्थ रहाणार आहे किंवा नाही' याचा जबाब मागितला ! फ्रान्सनं एक ऑगस्टला उत्तर दिलं, 'आमच्या हिताच्या दृष्टीनं उचित वाटणारी कृती आम्ही करू !' या उत्तरानं जर्मनी भडकला. तीन ऑगस्टला त्यानं फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलं ! या सर्व गडबडीत ब्रिटनची भूमिका स्पष्ट झाली नव्हती; परंतु चार ऑगस्टला जर्मनीनं बेल्जमवर हल्ला चढवून ब्रिटनलाही युद्धात ओढले होते. याच बेल्जमच्या तुकडीत दत्तू पटवर्धनांची भरती झाली होती !

१९१७ मधील नोव्हेंबर महिना फ्रान्सच्या दृष्टीनं जीवघेणा ठरला ! व्हर्दूनचा किल्ला हा फ्रान्सच्या लष्करी प्रतिष्ठेचा मानबिंदू होता. म्हणून तो ताब्यात घेण्यासाठी जर्मन सैन्य किल्ल्याच्या दगडी भिंतींवर धडका देत होतं. १९१६ मध्ये तर हा किल्ला हातचा जातो की काय, अशी फ्रान्सची अवस्था झाली होती. अशा वेळी हा किल्ला झुंजविण्याची जबाबदारी फ्रेंच व ब्रिटिश सैन्यावर येऊन पडली होती. असा हा किल्ला अखेरपर्यंत लढविला म्हणून 'व्हर्दूनची लढाई' ही पहिल्या जागतिक महायुद्धातील घनघोर व हातघाईची लढाई म्हणून ओळखली जाते. त्या लढाईत आमचे डी लॅकमन पॅट जखमी झाले. त्यामुळे त्यांना डब्लिनमधील 'रोमिबी मॅनॉर' ह्या वॉर-हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आलं. त्या वेळी त्यांच्या उजव्या मांडीत दोन गोळ्या लागल्या होत्या ! जखमा बऱ्या झाल्याबरोबर या शूर लढवय्याला 'रॉयल एअरफोर्स'मध्ये एअर मेकॅनिक म्हणून घेण्यात आलं. त्या वेळी एअरफोर्समधील सर्व टेस्ट उत्तम तऱ्हेनं पास होऊन ते नॉन-कमिशण्ड फ्लाइंग ऑफिसर झाले. त्यांना अनेक वेळा जर्मन प्रदेशावर बॉंबहल्ले करण्यास जावं लागलं. या वेळी प्रत्यक्ष बर्लिनवर जाण्यास इंग्लिश वैमानिक कचरत असत. कारण तेथील ॲंटी एअरक्राफ्ट गन्स फारच अचूक मारा करीत असत. युद्धावर अशी स्थिती असणं म्हणजे युद्धवीराला मानाचं निमंत्रणच ! ते पटवर्धन कसे सोडतील ? त्यांनी एकट्यानंच ब्रिटिश एअरमार्शलची भेट घेतली आणि 'मी बर्लिनवर बॉम्बर्स नेऊन हल्ला करून दाखवितो,' अशी प्रतिज्ञा केली ! एअरमार्शल प्रथम अवाक्‌ होऊन दत्तोपंतांकडे पहातच राहिला; परंतु त्यांचा पराक्रम आठवताच त्यांनी पॅटच्या हाताखाली सात बॉम्बर विमानांचा ताफा देऊन त्यांना बर्लिनवर पाठविलं. या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन पॅटनी दाट धुक्यात आपली विमानं लोटली नि बर्लिनच्या एका राजवाड्यावर व दारूगोळ्याच्या कोठारावर यशस्वी बॉम्बहल्ले केले आणि बॉंबर विमानांचा हा सारा ताफा इंग्लंडला सुखरूपपणे परत आणला ! हा

पराक्रम दत्तोपंतांनी १९१८ च्या नोव्हेंबरमध्ये केला! ह्या भीम-पराक्रमाची नोंद, इंग्लंडच्या तत्कालीन सम्राटांनी– बादशाह पंचम जॉर्जनी– त्यांना बकिंगहॅम पॅलेसवर बोलावून मोठ्या सन्मानपूर्वक घेतली. दोस्त सैन्याचे फ्रेंच सेनानी जनरल फॉक यांनीही त्यांचा मोठा सन्मान केला! पंचम जॉर्जनी डी. लॅकमन पॅटना राजवाड्यावर बोलावून घेतलं आणि त्यांना रत्नजडित मुठीची तलवार आणि किंग्जमेडल– परमवीर चक्रासारखे सन्मानदर्शक पदक देऊन त्यांचा शाही गौरव केला! त्याचबरोबर इंग्लंडच्या रॉयल एअरफोर्सचा सेकंड लेफ्टनंट हा लष्करी बहुमानदर्शक हुद्दाही दिला! सोबत एक प्रशस्तिपत्र बहाल केलं. या वेळी बादशहांनी ' A Manly young Maratha in our Air Force ' या शब्दांत त्यांना गौरविलं! या शाही सन्मानाबरोबरच इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान लॉइड जॉर्ज आणि इतर प्रमुख जनरलसनी प्रशस्तिपत्रं देऊन राष्ट्रीय नि सैनिकी सत्कार केला! त्या वेळी त्यांचा पगार दरमहा बाराशे रुपये इतका होता!

### केवढी ही झेप! केवढी ही भरारी!

रेल्वेचा इंजिन-ड्रायव्हर, ग्लासगोचा मरीन इंजिनियरिंगचा जगन्मान्य सर्टिफिकेटधारक, बोटीचा कप्तान, रुग्णवाहिका, मशिनगन रेजिमेंटमध्ये निवड नि शेवटी रॉयल एअरफोर्समध्ये खुद्द पंचम जॉर्ज राजांकडून सेकंड लेफ्टनंट हा बहुमान मिळविणारा बॉम्बर विमानाच्या ताफ्याचा वैमानिक, लढवय्या नेता! आणि हे सारं कर्तृत्व वयाच्या केवळ पंचविसाव्या वर्षापासून पस्तिसाव्या वर्षापर्यंत – फक्त दहा वर्षात गाजविलेलं! त्यामुळं केवळ अपूर्व!

ब्रिटनमधील सन्मानाबरोबरच फ्रेंच सरकारनं एक सुवर्णपदक नि सर्टिफिकेट– पटवर्धनांना– ते अलाइड फोर्सेसचे एक लढवय्ये या नात्यानं देऊन त्यांचा गौरव केला! या पराक्रमाची नि सन्मानाची नोंद इंग्लंडच्या बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून गौरवपर लेख लिहून केली गेली! 'ग्रॅफिक' नावाच्या सुप्रसिद्ध सचित्र साप्ताहिकात त्यांचा एक फोटो आणि त्यांचं संपूर्ण चरित्र प्रसिद्ध झालं होतं! त्याचबरोबर १५ मार्च १९१९ च्या 'लंडन मिलिटरी गॅझेट'मध्ये त्यांचे एकट्याचे भारतीय सेकंड लेफ्टनंट म्हणून नाव छापून आलं! त्या वेळच्या प्रमुख भारतीय वृत्तपत्रांतून त्यांची वाहवा झाली. गौरवपर लेख प्रसिद्ध झाले!

१३ मे १९१९ चे केसरीचे अंकात तात्यासाहेब केळकरांनी दत्तोपंत पटवर्धनांबद्दल 'संधी द्या व कर्तबगारी पहा!' या शीर्षकाचा लेखच लिहिला. त्यात तात्यासाहेब लिहितात–

'इ. स. १८३३ साली ईस्ट इंडिया कंपनीनं जो एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात असं एक कलम होतं की जो कोणी माणूस एखाद्या विशिष्ट कामाला लायक आहे असं आढळून येईल, त्याला त्याच्या जातीचा, धर्माचा अगर रंगाचा विचार न करता त्या कामावर नेमावं. पुढे १८५८ साली व्हिक्टोरिया राणीचा जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला त्यातही पुनश्च असं ग्रथित करण्यात आलं की, एखाद्या व्यक्तीला त्याची लायकी एखाद्या विशिष्ट कामाकरिता दिसून आल्यास त्याला त्या कामावर नेमावं व त्या वेळी पूर्वी अनेकवार सांगितलेलं समतेचं व नि:पक्षपातीपणाचं तत्त्व पाळलं जावं. तथापि जरी एक हक्क म्हणून दरवर्षी दहा भारतीयांना लष्करी हुद्द्याच्या जागा द्याव्यात असा सरकारी ठराव पास झाला होता तरीसुद्धा १९१७ पर्यंत एकाही भारतीयाला लष्करात ऑफिसरची जागा मिळालेली नाही व अशा जागा मिळविण्यात किती काळ जाईल ते कळत नाही. नौदलात तर भारतीयांना मुळीच स्थान नाही, अशी गेल्या शंभर वर्षातील लष्करी बाबतीत प्रगती आहे; पण थोड्याच दिवसांपूर्वी एक फार आश्चर्यकारक घटना घडली व ती अशी की, ब्रिटिश लष्कराचं एक नवीन अंग म्हणजे वैमानिक दल, त्यात श्री. दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धन ह्या भारतीय जवानाला सेकंड लेफ्टनंट ह्या हुद्द्यावर नेमून किंग्ज कमिशन देण्यात आलं! श्री. पटवर्धन हे त्या काळी इंग्लंडमध्ये राहून यांत्रिक शिक्षण घेत होते व त्यांनी लष्करात भरती व्हावी म्हणून, इंग्लंडच्या युद्धखात्याकडे अर्ज केला होता; परंतु केवळ एक भारतीय म्हणून त्यांना नकार देण्यात आला आणि श्री. पटवर्धन यांनी धीर न न सोडता, अत्यंत चिकाटीनं लौकरच ब्रिटिश ॲम्ब्युलन्स कोअरमध्ये प्रवेश मिळविला आणि पुढे त्यांची हुषारी व कर्तव्यदक्षता लक्षात येताच त्यांना खुद्द ब्रिटिश लष्करात एक लष्करी शिपाई म्हणून प्रवेश मिळाला. फ्रान्सच्या रणांगणावर अनेक वेळा आपल्या अंगचे शौर्य प्रकट केल्यानंतर त्यांना वैमानिक दलात घेण्यात आलं व आता ते आपल्या कष्टांची व प्रयत्नांची गोड फळं सेकंड लेफ्टनंटच्या हुद्द्यामुळं चाखीत आहेत. आम्हाला अशी पक्की खात्री आहे की, भारतीय जवानांना योग्य संधी मिळत गेल्या तर ते पराक्रम करण्याच्या कोणत्याही बाबतीत कमी पडणार नाहीत!'

–(केसरी दि. १३ मे, १९१९)

अशा प्रकारे हे सारे शाही, सैनिकी, राष्ट्रीय नि 'केसरी'सारख्या स्वदेशी मुखपत्रांनी केलेले सन्मान घेऊन दत्तोपंतांना कृतार्थ वाटलं! आपलं आयुष्य धन्य वाटलं त्यांना! तोवर ११ नोव्हेंबर १९१८ या दिवशी, सकाळी पाच वाजता, खास सरसेनानीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या नि कॉपिएन्सच्या जंगलातील रेथॉन्द येथे उभ्या केलेल्या आगगाडीतील एका डब्यामध्ये – सरसेनानीच्या कचेरीत – मार्शल फॉश्नी कैसरच्या प्रतिनिधीकडून – जर्मन सेनानींकडून – लष्करी पद्धतीने अभिवादन घेतले आणि जर्मनीने फ्रान्सकडे केलेल्या युद्धविरामाच्या याचनापत्रावर स्वाक्षरी करून घेऊन मग हे पहिले जागतिक महायुद्ध संपले!

पंचम जॉर्जनी 'A Manly Young Maratha in our Air Force' अशा शब्दात गौरविलेल्या या खऱ्या मराठ्याला–लढवय्या महाराष्ट्रीयाला पुन्हा एकदा हिंदुस्थानला जाण्याची ओढ लागली. विधवा आईच्या मांडीवर सोपवून आलेल्या, त्या वेळी सहा दिवसांच्या असलेल्या परशुरामाचं लालन-पालन कसं झालं असेल? कसा दिसत असेल तो? कोणासारखा दिसत असेल? 'माज्ये बाबा लडाईवर गेलेत' असं बोबड्या बोलांनी बाळ-गोपाळांना जमवून कसा

## 'A Manly young Maratha in our Air-Force!'

सांगत असेल ? या विचारांनी त्यांच्या डोळ्यांसमोर रत्नागिरीमधील खालच्या आळीतील ते कौलारू घर दिसू लागलं ! पुढं दगडी गडग्यानं बंदिस्त केलेलं नि दर आठवड्याला सारवण होत असलेलं लख्ख अंगण ! लाकडी उभे चौकोनी बार लावून हवेशीर केलेली पडवी, त्यातला तो लांबलचक झोपाळा ! त्याच्यापुढं हातभर उंचीवर असलेला सोपा, माजघर, स्वयंपाकघर, मागं केळीची, नारळी-पोकळीची, हापूस आंब्याची कलमं ! दगडी डोण नि पाट बांधून पाणी घरात घेण्याची सोय केलेली रहाटगाडगी लावलेली भल्या मोठ्या माळेची, पायानं फिरवून पाणी उपसून काढता येण्याची सोय केलेली विहीर, बाजूचा भलामोठा आंघोळीसाठी ठेवलेला दगड, सारं सारं डोळ्यांसमोर जसंच्या तसं उभं राह्यलं ! मन तडफडू लागलं, रत्नागिरीला जाण्यासाठी – हिंदुस्थानला परत जाण्यासाठी !

रॉयल एअर फोर्सच्या कमांडिंग ऑफिसरची त्यांनी भेट घेतली. त्या उमद्या ब्रिटिश ऑफिसरने त्यांची पाठ थोपटली नि कुतूहलानं विचारलं, 'डी. लॅकमन पॅट' हे तुझं नाव कोणी दिलं ?' युद्धाच्या धामधुमीत ही गोष्ट विचारायची राहूनच गेली होती तशीच! त्यामुळं आज त्या ऑफिसरनं त्या नावाची हकीकत विचारली. दत्तोपंतांनी रत्नागिरी सोडल्यापासूनची सारी हकीकत त्याला सांगितली. जे. स्मिथची गाठ कशी पडली, त्यानंच हे नामकरण कसं केलं, नि त्यामुळं पुढचे सारे अडथळे दूर होऊन हॅंबुर्ग, ग्लासगो नि डब्लीन येथील शिक्षण कसं पूर्ण करता आलं, कॅप्टन हेन्रिचनं कशी मदत केली, त्या जगन्मान्य सर्टिफिकेटचा उपयोग 'एस्. एस्. तुकाराम' ही नवी कोरी बोट रत्नागिरीला सर्वप्रथम घेऊन जाण्याचा मान कसा मिळाला, त्या वेळी वडिलांपुढे केलेली प्रतिज्ञा कशी पूर्ण केली, त्यानंतरचे कौटुंबिक आघात नि त्यामुळं फिरून परदेशी प्रयाण करण्याचा प्रसंग ! 'एस्. एम्. ग्रेब'वरील नोकरी नि पुढं अँब्युलन्स कोअर नि मशिनगन्स रेजिमेंटमध्ये प्रवेश आणि त्या पुढील सर्व हकिकत कमांडिंग ऑफिसरनं आठवण म्हणून स्वतः सांगितली. ती ऐकून पटवर्धन थक्क झाले–त्या ऑफिसरचा तो इतका उमदेपणा पाहून !

कमांडिंग ऑफिसरनी त्यांची रजा मंजूर केली. पटवर्धन समुद्रमार्गानं १९२० सालच्या मे महिन्यात भारतात परत आले. मुंबईला गव्हर्नरांचे पाहुणे म्हणून त्यांना दोन दिवस शाही पाहुणचार मिळाला ! त्या काळातील मुंबईच्या ब्रिटिश गव्हर्नराचे पाहुणे असा मान मिळालेले दत्तोपंत हे पहिले भारतीय होत ! दत्तोपंतांच्या लष्करी कॅपवरील हे आणखी एक मानाचं पीस !

'एस्. एस्. तुकाराम' या बोटीनंच ते दुसऱ्या वेळी रत्नागिरीस परत आले !

दत्तोपंतांच्या डोळ्यांसमोर 'एस्. एस्. तुकाराम' बोटीचा कॅप्टन या नात्यानं रत्नागिरी बंदरात प्रवेश केलेल्या त्या दिवसाची आठवण झाली. धक्क्यावर उतरताच भाऊ परांजपे, आगाशे, केळकर ही वडील मंडळी दिसतील या अपेक्षेनं त्यांनी पाहिलं; पण–पण त्यांच्यापैकी त्यांना कोणीच तेथे आलेलं दिसलं नाही. तिथे दिसले त्यांचे एक शेजारी– फोंडे सावंत, विनायक केळकर, अनंता आगाशे, तात्या परांजपे– सारे त्यांचे शाळासोबती ! त्या साऱ्या बालमित्रांनी पहिल्या जागतिक महायुद्धात वैमानिक बनून जर्मनांना धूळ चारून विजय मिळवून परत आलेल्या त्या आपल्या वीरमित्राला खांद्यावरून मिरवत, वाजत–गाजत घरी आणलं ! मातोश्रींना पाहताच दोघांचेही डोळे भरून आले ! लहानगा परशराम टकटका पाहू लागला ! आईनं म्हटलं, 'दत्तू ! सांभाळ रे बाबा आता तुझ्या परशरामाला ! मला म्हातारीला आता होत नाही बाबा ! आणि त्या पोरक्या पोराला आई आणायचं मनात घे आता ! घर लक्ष्मीवाचून सुनं सुनं दिसतंय् रे !'

दत्तूनं फक्त डोळे पुसले नि छोट्या परशुरामाला घेऊन तो भगवती किल्ल्यावर जाऊन बसला !

दुसऱ्याच दिवशी ब्रिटिश सेनादलातील एक युद्धवीर– सेकंड लेफ्टनंट म्हणून रत्नागिरीच्या त्या वेळच्या इंग्रज कलेक्टरनी त्याचं शाही स्वागत केलं ! त्या वेळी त्यांना जिल्हा पोलीसदलाकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला ! एका भारतीयाचा ब्रिटिश अधिकाऱ्यानं ब्रिटिश शासनकर्त्यांतर्फे केलेला शाही सन्मान होता तो !

शाही सन्मानाला जाताना त्यांनी संपूर्ण लष्करी पोशाख केला होता. कमरेला ती पंचम जॉर्जनी दिलेली रत्नजडित मुठीची तलवार लटकविली होती. छातीवर पदके लटकत होती. त्यात सोन्याचं ते किंग्जमेडल चमकत होतं. जिल्हा पोलीस दलाची मानवंदना स्वीकारताना बाजूला हातात नंगी तलवार घेऊन एक इंग्रज पोलीस-अधिकारी अदबीनं चालत होता. साऱ्या रत्नागिरीकरांच्या डोळ्यांचं पारणं फिटलं ! पारतंत्र्यात जखडलेल्या भारतीय प्रजेपैकी एका भारतीयाचं ब्रिटिश सरकारकडून मानवंदना देऊन स्वागत होत होतं ! आणि हा प्रसंग घडत होता, ज्या वेळी तो रत्नागिरीचा 'केसरी' इंग्रजी शासनाच्या गंडस्थळावर झेप घेऊन ती खिळखिळी करीत होता त्यावेळी !

रत्नागिरीच्या त्या वास्तव्यातील त्यांच्या काही आठवणी त्यांचे पुतणे– इंग्रजीचे सेवानिवृत्त वृद्ध शिक्षक श्री. एम. जी. पटवर्धन (वय ७२) सांगतात–

'बंदरावरून काका घरी आले, त्या वेळी मी एका बाजूला उभा राहून त्यांचं निरीक्षण करीत होतो. सर्वांची विचारपूस करता करता माझ्याजवळ येता येता त्यांनी विचारलं– 'हू इज ही ?' मी नुकताच मॅट्रिक परीक्षेला बसलो होतो. आपलं इंग्रजी ज्ञान दाखविण्यासाठी मी उलट विचारलं, 'आर यू माय दत्तूकाका ?' हा धीट प्रश्न ऐकून त्यांना मोठा आनंद झाला. पुढे एके वेळी फणसाचे गरे ताटलीत ठेवून दत्तूकाकांना खाण्यासाठी दिले. ते गरे पाहून दत्तूकाका म्हणाले, 'व्हॉट इज इट कॉल्ड् अॅज– अॅज– हं हं– 'फणस' आय थिंक !' आणि असं म्हणून आपण एका नवीन पदार्थाचा शोध लावला, या थाटात त्यांनी ते गरे संपविले ! गेली सहा-सात वर्षं ब्रिटनमध्ये काढल्यामुळं काही गोष्टी ते विसरले होते. त्यांनी गाजविलेल्या पराक्रमाचं रहस्य 'सर्वस्व विसरून केवळ हाती असलेलं काम पूर्ण करायचं' या त्यांच्या वृत्तीत दिसून येत होतं ! लहान मुलं त्यांना फार आवडत असत. मुलं जवळपास असली की, त्यांना काही तरी खायला देऊन, गोष्टी सांगून ते त्यांच्यात रंगून जात !

रत्नागिरीच्या याच वास्तव्यातील त्यांचे एक शेजारी श्री. बाळबा सावंत (आज वय ७२) सांगतात–

'सकाळी त्यांना न्याहारी म्हणून तीन अंडी फेसून मीठ घालून

खायला लागत. तो समारंभ आमच्या घरी होत असे. अर्थात त्यांनी घरी कोणतेही पथ्य–कुपथ्य, भक्ष्य–अभक्ष्य असा भेद ठेवला नव्हता. घरी ते मांसाहार करीत, त्या वेळी प्रसिद्ध असलेली 'थ्री कॅसल' ही परदेशी बनावटीची सिगारेट त्यांना लागत असे! धनजी नाक्यावर त्या वेळी अशा परदेशी सिगरेटी विकण्याचं दुकान होतं. तेथून मी त्यांना बऱ्याच वेळा त्या 'थ्री कॅसल' सिगरेटी आणून दिल्या आहेत. त्यांच्या खालच्या आळीतील घरात, माजघरात एक कोनाडा होता, त्यांत ते नोटा उघड्यावर ठेवीत. त्या वेळी सुरती रुपयेदेखील असत. तेही तेथेच एका थैलीत ठेवलेले असत. सारा खुल्ला व्यवहार! सिगरेट आणायला सांगितली की, 'जा रे बाळबा, त्या कोनाड्यातले पैसे घे!' असं फर्मान सोडीत. आम्ही, त्यातून लागतील तितकेच मोजके पैसे घेत असू. सिगरेट आणून दिल्यानंतर काही तरी बक्षीस देत! बिस्किटांचे एक-दोन पुडे तरी असे बक्षिसावारी खर्च होत असत! ते 'पिणारे' नव्हते; पण कधीमधी ड्रिंक घेत असत. अस्सल इंग्लिश वाईन! सोबतीला माझे वडील असत. त्यांच्यावर दत्तूकाकांचा फार लोभ! त्यांना ते फोंडे सावंत म्हणत! बाहेरून आले की, फर्लांगभरच्या अंतरावरून मोठ्यानं हाक मारीत– 'वो! फोंडे सावंत, फोंडे सावंत चला, सारवट जोडा. कलेक्टरला भेटायला जायचं आहे!' कलेक्टरला भेटायला जाताना गुलाबी फेटा, सरदारी कोट, सुरवार, कमरेला पंचम जॉर्ज बादशहांनी दिलेली रत्नजडित मुठीची तलवार नि छातीवर किंग्जमेडलसह सारी युद्धपदकं लावून मोठ्या दरबारी थाटात निघत असत! त्यांची स्वारी निघाली की, ते वीररूप पहायला सारे रत्नागिरीकर घराबाहेर येऊन त्यांना डोळाभर पहात असत! दरारा भयंकर होता. आवाज पहाडी, त्यामुळं लोक टरकून असत! त्यात त्यांचं शुद्ध चारित्र्य, व्यसन म्हणून कोणतंही नाही; पण आठवड्यातून एकदा घरी मांसाहारी जेवण व्हायचं! सोबतीला फोंडेसावंत, त्यात हयगय नाही किंवा कोणाचा मुलाहिजा ठेवायचा नाही. त्यावरून नावं ठेवणाऱ्या, नाकं मुरडणाऱ्यांना दत्तूकाका मुळीच घाबरत नसत. फार उमदा, रुबाबदार आणि पहाताच धाक वाटावा असा वीरपुरुष!'

त्यांच्या रजेच्या याच मुदतीत त्यांना सांगली संस्थानाधिपती श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी सांगलीला बोलावून घेतले होते! सांगलीचं पटवर्धन राजघराणं रत्नागिरीच्या गणपतिपुळ्याचं. मूळ पुरुष हरभट पटवर्धनांनी एकवीस दिवस प्रायोपवेशन करून गणपतीची उपासना केल्यानंतर गणपती प्रसन्न होऊन त्यांना घाटावर पेशव्यांकडे जाऊन नोकरी पत्करण्याचा दृष्टान्त दिला होता. त्याप्रमाणं हरभट घाटावर आले. त्यांचा पराक्रम पाहून दक्षिण महाराष्ट्राची जहागीर पेशव्यांनी त्यांना दिली होती. त्यांचे सात मुलगे सांगली, मिरज, जमखिंडी, कुरुंदवाड इ. संस्थानांचे प्रमुख झाले! त्यांपैकी सांगली संस्थानच्या तत्कालीन अधिपतींनी–श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेबांनी–दत्तोपंत यांना 'पटवर्धन घराण्या'चं नाव पहिल्या जागतिक महायुद्धात गाजविलं म्हणून मुद्दाम सरकारी पाहुणे म्हणून बोलावून घेतलं होतं! सरकारस्वारींनी त्यांना एक सोन्याची सल्लेजोडी आणि चांदीचा इंग्लिश पद्धतीचा टी-सेट देऊन गौरव केला! संस्थानचे सन्माननीय पाहुणे म्हणून त्यांना चार दिवस राजवाड्यात ठेवून घेतलं होतं आणि सन्मानपूर्वक निरोप दिला होता! त्याच वेळी सांगली नरेशांनी त्यांचा आपल्याबरोबर एक फोटोही काढून घेतला होता.

अशा बड्या लोकांच्या मध्यस्थीनं अमरावतीचे प्रसिद्ध वकील श्री. दादासाहेब शेवडे यांच्या एक विदुषी भगिनी श्रीमती चंद्राताई शेवडे यांच्याशी त्यांचा द्वितीय विवाह संपन्न झाला! उद्ध्वस्त झालेलं भावजीवन पुन्हा सुरू झालं! मुलगा आणि द्वितीय पत्नी यांना घेऊन ते परत मुंबईमार्गे लंडनला नोकरीवर रुजू होण्यासाठी गेले. जाताना मुंबईच्या गव्हर्नरांचा एक दिवस पाहुणचार झाला.

१९२१ ते १९२८ या सालातील शांततेच्या कालखंडातील त्यांची विमानदलातील नोकरी अत्यंत स्वस्थपणाची झाली. १९०९ पासून १९२० पर्यंत सतत चाललेली धडपड काही काळ थांबली! या अकरा वर्षांच्या दगदगीची विश्रांतीच जणू या सहा–सात वर्षांत त्यांनी घेतली. पुढे पत्नीला हवा मानवेनाशी झाल्यामुळं त्यांनी हिंदुस्थानात बदली मागितली. त्यांच्याबद्दल खुद्द मार्शल डग्लस इ. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनात आपुलकीची भावना असल्यामुळं त्यांची विनंती तात्काळ मान्य करण्यात येऊन त्यांना १९२८ मध्ये आर्मी इन् इंडिया रिझर्व्ह ऑफिसर्स (A. I. R. O.) या इंग्लिश सैन्यदलात सिकंदराबाद येथे लेंट सर्व्हिसेसवर बरचा–लेफ्टनंटचा–हुद्दा देऊन पाठविण्यात आले! तेथे ते दीड–दोन वर्षंच होते. १९२१ पासून सतत आठ–नऊ वर्षं विशेष पराक्रम न करता नुसतीच वस्त्रं परिधान करून ऑफिसरशिप गाजविणं या रूटिन आयुष्याचा दत्तोपंतांना मनस्वी कंटाळा आला. ◻

## उत्तरार्ध

त्या वेळची हिंदुस्थानातील परिस्थितीही आमूलाग्र बदलू लागली.

इ. स. १८५८ ते १९२० पर्यंतच्या बादशाही अंमलावर हिंदुस्थानच्या प्रजेचं नियंत्रण नव्हतं; परंतु दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल नि लोकमान्य टिळक यांनी चेतवून दिलेल्या स्वराज्याच्या चळवळीची ज्वाला भडकू लागली! या राज्यपद्धतीत सुधारणा होऊन हिंदुस्थानात कायदेमंडळातील प्रतिनिधींस जबाबदार अशी राज्यपद्धती क्रमाने अस्तित्वात येऊ लागली. या सुधारणांच्या योजनेची चर्चा चालू असतानाच इंग्रज सरकारनं रौलट कमिटीच्या शिफारशींवरून जाहीर सभेवर नियंत्रण घालणारे कायदे लोकमताच्या विरोधास न जुमानता संमत करून घेतले. या कायद्यांचा निषेध करण्याकरिता अमृतसर येथील जालियनवाला बागेतील सभेवर निर्घृण गोळीबार होऊन मोठं हत्याकांड झालं. त्यामुळं देशात भयंकर असंतोष उत्पन्न होऊन महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली असहकारितेची चळवळ झाली. जिकडे तिकडे विद्यार्थ्यांनी सरकारी व निमसरकारी शाळा सोडल्या. वकिलांनी वकिली बंद केली. सरकारी बहुमानाच्या पदव्या मिळालेल्यांनी पदव्यांचा त्याग केला. याचबरोबर खादीचाही चोहोकडे जोराने प्रसार झाला. १९२३सालापासून चित्तरंजन दास यांच्या नेतृत्वाखाली कौन्सिलातील अडवणुकीची चळवळ सुरू झाली. १९२७ च्या अखेरीस सरकारनं सुधारणा-कायद्याची फेरतपासणी करण्याकरिता सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश पार्लमेंटातील हुजूर, मजूर

न उदार या तिन्ही पक्षांच्या मिळून सात सभासदांचं कमिशन नेमलं. देशातील प्रमुख पुढाऱ्यांस या कमिशनमध्ये हिंदी प्रतिनिधी नसल्यामुळं त्याची रचना सदोष वाटून त्यांनी त्यावर बहिष्कार टाकला. त्यात लाला लजपतराय यांना पोलिसांनी प्राणांतिक लाठी-मारानं जायबंदी केलं. या असंतोषाचा परिणाम म्हणून क्रांतिवीर भगतसिंगांनी १९२९ च्या आरंभी दिल्ली येथील कायदेमंडळाच्या सभागृहात सर्व सभासद बसले असताना बाँब फेकला !

त्याच वर्षी लाहोरला दयानंद कॉलेजच्या परिसरात तेथील डी. एस्. पी. सँडहर्स्ट याचा खून करून भगतसिंग, राजगुरु नि सुखदेव या क्रांतिकारकांनी लालाजींवर झालेल्या प्राणांतिक लाठीमाराचा बदला घेतला ! याच सँडहर्स्टनं काही महिन्यांपूर्वी लाठीमारानं लालाजींचा बळी घेतला होता. भगतसिंग, राजगुरु इ. सर्वांना अटक झाली. या कटातील एक आरोपी जतीनदास यांनी तुरुंगात ६१दिवस उपवास करून १३ सप्टेंबर १९२९ रोजी प्राणत्याग केला ! ही बातमी कळताच सरकारचा निषेध करण्यासाठी त्या वेळी कलकत्ता येथे सुमारे पाच लक्ष लोकांची संतप्त मिरवणूक निघाली. देशभर प्रचंड आंदोलनं सुरू झाली !

३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर-काँग्रेसमध्ये रावी नदीच्या काठावर हजारो लोकांच्या जमावानं पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडलेला पूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला. २६ जानेवारी १९३० रोजी हा ठराव काँग्रेस कार्यकारिणीच्या वतीनं निवेदनरूपानं सर्व देशभर वाचून दाखविण्यात आला. जनतेनं त्याला प्रचंड पाठिंबा दिला आणि त्याच दिवशी देशभर स्वातंत्र्याची ती सुप्रसिद्ध प्रतिज्ञा घेण्यात आली !

पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत झाला आणि ते मिळविण्यासाठी सविनय कायदेभंगाच्या मार्गानं राष्ट्रव्यापी लढा देण्याचं ठरविलं. तिचं नेतृत्व गांधीजींनी केलं. गांधीजींनी मिठाचा कायदा तोडण्याचं ठरविलं !

मिठावरील कर उठविण्यासाठी समुद्राच्या पाण्याचं मीठ तयार करणं हा एक कायदेभंगाचा प्रकार होता. गुजरातेतील दांडी येथे समुद्रकाठी जाऊन हा कायदेभंग करण्याचं गांधीजींनी ठरविलं.

देशातील या साऱ्या चळवळींकडे वीर पटवर्धनांचं बारीक लक्ष होतं. कोणास ठाऊक, कदाचित त्याचसाठी त्यांनी हिंदुस्थानात बदली मागितली असेल ! 'पत्नीला हवा सोसत नाही' हा बहाणा असू शकेल; पण १२ मार्च १९३० रोजी ७८ सत्याग्रही घेऊन महात्माजी साबरमती आश्रमातून दांडीला निघाले, तेव्हा देशभर तशाच तऱ्हेची निदर्शनं सुरू झाली.

दत्तोपंत सिकंदराबादहून तडक मुंबईला आले आणि त्यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला !

सतत बारा वर्षं अंगावर दिमाखानं मिरविलेला लेफ्टनंटचा ब्रिटिश लष्करी पोषाख टाकून देऊन संपूर्ण खादीचा वेश परिधान करून दत्तोपंत काँग्रेसच्या मिठाच्या सत्याग्रहात सामील झाले !

आर्मी इन इंडिया ऑफ रिझर्व्ह ऑफिसर्स (A. I. R. O.) या सिकंदराबादच्या लष्करी युनिटमध्ये एकच धावपळ झाली ! त्यांच्या कुटुंबाला सरकारी निवासस्थानातून घालवून देण्यात आलं ! बायको अमरावतीस माहेरी गेली. दत्तोपंतांना इतर सत्याग्रहींबरोबर अटक झाली ! त्यांचे सारे हुद्दे काढून घेण्यात आले ! पेन्शन बंद झाली ! दत्तोपंतांचं खरं राष्ट्रीय स्वरूप प्रकट झालं !

याच ध्येयासाठी त्यांनी परदेशी जाऊन कचदेवाप्रमाणं पाश्चिमात्त्य विद्या हस्तगत करून रेल्वे-इंजिन चालविण्याचं शिक्षण, हॅंबुर्गचं मरीन इंजिनियरिंग शिक्षण, ग्लासगो येथील मरीन इंजिन अटेन्डन्टचं नि कोस्टल नॉव्हिगेशन कोर्सचं जगन्मान्य सर्टिफिकेट, ब्रिटिश मशिनगन रेजिमेंटमधील अनुभव–विमानोड्डाण नि रॉयल एअरफोर्समधून प्रत्यक्ष रणयुद्धात–पहिल्या जागतिक महायुद्धात–मर्दुमकी गाजविणं ही शिखरं एकामागून एक सर केली होती असं वाटू लागतं ! नाही तर त्या वेळचा दरमहा बाराशे, पंधराशे रुपये-पगार ब्रिटिश सर्वोच्च सत्तेकडून झालेला सन्मान ही सिद्धी प्राप्त झालेला कोणता महाभाग हा फकिरी मार्ग पत्करील ? पण रत्नागिरीच्या नि पर्यायानं महाराष्ट्राच्या रक्तात मुरलेली स्वातंत्र्यप्रेरणा त्यांना कशी गप्प बसू देईल ?

दत्तोपंत स्वातंत्र्य–सैनिक–सत्याग्रही झाले !

सत्याग्रही म्हणून आपली भूमिका बजावल्यानंतर त्यांनी परत एकदा रत्नागिरीचा रस्ता धरला ! तिथे त्यांनी 'कॉमनवेल्थ स्काऊट ट्रुप्स' काढून एकीकडे देशसेवा नि एकीकडे कुटुंबपोषणव्यवस्था केली ! पण खूप हाल होत. स्काउटमध्ये असे कितीसे तरुण आकर्षित होणार ? आणि तेही रत्नागिरीसारख्या सतत पोटाची चिंता असणाऱ्या परिसरात ? पण दत्तोपंतांनी १९३९ पर्यंत कसेबसं निभावून नेलं !

१९३९ साली दुसरं महायुद्ध सुरू झालं !

कॉपिएन्सच्या जंगलातील रेथॉन्द येथे आगगाडीच्या डब्यात कैसरच्या प्रतिनिधीकडून फ्रेंचांनी लिहून घेतलेल्या शरणागतीचा सूड उगविण्यासाठी हेर हिटलर यानंच ते दुसरं महायुद्ध पेटविलं !

११ मार्च १९३८ च्या रात्री हिटलरची सेना ऑस्ट्रियामध्ये घुसली !

१४ मार्च १९३९ या दिवशी स्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याची हिटलरनं घोषणा केली !

३१ ऑगस्ट १९३९ या दिवशी हिटलरने आपल्या सरसेनातीला १ सप्टेंबरच्या पहाटे पोलंडवर आक्रमण करण्याची आज्ञा दिली !

आणि दुसऱ्या महायुद्धाची ज्वाला भडकली !

लढवय्या डी लॅकमन पॅटना गप्प बसवेना. पहिल्या जागतिक महायुद्धातील रणभूमी दृष्टीसमोर दिसू लागली. बाँबर विमानांचे आवाज कानांत घुमू लागले. मशिनगन्स नि बाँबचे धडाड्धुडूम् आवाज कानठळ्या बसवू लागले ! किंग्ज मेडल घेऊन ते तासन् तास न्याहाळून पाहू लागले. तो रत्नजडित मुठीची तलवार किती वेळ कमरेला लटकविली याला गणती नाही !

पॅटनी तडक दिल्ली गाठली; पण या वेळी युद्धभूमीवर जाण्यासाठी नव्हे, आपणासारखा पराक्रम गाजवू शकणारे वीरयोद्धे तयार करण्याची योजना व्हाईसरॉयला समजावून सांगण्यासाठी ! दत्तोपंतांमधील युद्धशिक्षक आता जागा झाला होता !

त्या वेळी लॉर्ड लिन्लिथगो हे व्हाइसरॉय होते. पॅटची ओळख, त्यांना पंचम जॉर्जनी शाही सन्मान बहाल केला त्या वेळीच झाली होती. पॅटनी त्यांची भेट मागितली त्या वेळी व्हाइसरॉयनी

त्यांना महात्माजींच्या लढ्यात सक्रिय भाग घेतल्याबद्दल कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला. दत्तोपंत भडकले ! त्यांनी लॉर्ड लिन्लिथगो यांना स्पष्टपणानं बजावलं, 'सर, मी माझे काढून घेतलेले अधिकार, सन्मान नि पेन्शन परत मागण्याची याचना करण्याकरिता नाही आलो ! सर, प्रथम मी भारतीय आहे. नतर सर्व काही ! पहिल्या महायुद्धातदेखील पराक्रम गाजविला तो माझ्यासारखे हजारो भारतीय वीर निर्माण व्हावेत या हेतूनं ! जोवर तुम्ही राज्यकर्ते आहात तोवर आम्हा सैनिकांचा पराक्रम तुमच्यासाठी उपयोगात आणला जाईल !

'सर ! आता तर साऱ्या मानवतेचा शत्रू हर हिटलर–समोर शत्रू म्हणून उभा ठाकला आहे. त्याच्यावर हजारोंनी तुटून पडण्याकरिता माझे देशबांधव तयार व्हावेत, यासाठी वीरयोद्धे तयार करण्यासाठी मी एक योजना घेऊन आलो आहे ! कृपा करून आपण त्याचा स्वीकार करून मलाही राजसेवेची नि त्याजबरोबर देशसेवेची संधी मिळवून द्या ! मी आपला आजन्म ऋणी राहीन ! '

प्रत्येक क्षेत्रात पदार्पण करताना केवळ स्वतःचा परमोच्च पराक्रमच दाखवून स्वकर्तृत्वावर पुढे येणाऱ्या 'डी लॅकमन पॅट 'ने स्वदेशासाठी, स्वदेशबांधवांना वीरयोद्धे म्हणन तयार करण्यासाठी, आयुष्यात प्रथमच इंग्रज व्हाइसरॉयपुढं याचना केली होती ! पदर पसरला होता !

हे दुसरं महायुद्ध जिंकून हेर हिटलरसारखा मानवतेचा शत्रू नष्ट करायचाच, अशी जिद्द बांधलेल्या त्या इंग्रज सर्वाधिकाऱ्यानं दत्तोपंतांना त्यांची योजना सादर करण्यास अनुमती दिली ! आपल्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याचा सल्ला घेऊन लॉर्ड लिन्लिथगो यांनी पॅटना नवी दिल्ली येथे 'ऑल इंडिया मिलिटरी स्कूल' ही संस्था स्थापन करण्यास अनुज्ञा दिली !

'ऑल इंडिया मिलिटरी स्कूल' या संस्थेनं प्रथम पंचवीस विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन मिलिटरी, नेव्हल आणि एअरफोर्स या तिन्ही शाखांतील शिक्षण दिले. त्यातूनच या तिन्ही शाखांतील व्हॉइसरॉय व किंग्जकमिशन मिळवून देऊन कित्येक हिंदी तरुणांना लष्करी शिक्षणाची गोडी लावली. त्यांचे हे लष्करी जवान घडविण्याचं काम सतत चार वर्षं दिल्लीला चालू होतं !

१९४३ च्या सुरुवातीपासून त्यांची खणखणीत तब्येत नादुरुस्त झाली. वैद्यकीय तपासणीत पटवर्धनांना कॅन्सरचा विकार झाल्याचे उघडकीस आले. त्या वेळी मुंबईत कॅन्सरवर उपचार होत असत आणि तेही शस्त्रक्रिया करून !

दत्तोपंतांना शस्त्रक्रियेसाठी टाटा कॅन्सर हॉस्पिटलात ठेवून घेण्यात आलं त्या वेळी १९४३ साल होतं. आज १९७८ आहे. या पस्तीस वर्षांत कॅन्सर हा रोग अद्याप असाध्य असाच राहिला आहे ! एका विजिगीषु वृत्तीच्या वेडर नि अजिंक्य वीराला तशाच असाध्य नि मानवी वैद्यकशास्त्राला अजिंक्य असलेल्या कॅन्सरनं २६ ऑक्टोबर १९४३ या दिवशी ऑपरेशन टेबलावरच या जगातून ओढून नेलं ! किती विलक्षण योगायोग हा ! !

वाटलं की, परमेश्वरानं या अजोड धैर्याच्या अजिंक्य वीराला नेण्यासाठीच कॅन्सरसारख्या असाध्य रोगाची नेमणूक केली, नाही तर या 'पॅट 'नी इतर कोणत्याच रोगाची डाळ शिजू दिली नसती नि वीर सावरकरांसारखे मृत्युंजयच झाले असते !

भारतातील या पहिल्या लढाऊ सैनिक, वैमानिक, लेफ्टनंटचं नाव रत्नागिरी येथे नुकत्याच बांधलेल्या विमानतळास द्यावं असा ठराव २४ मार्च १९६५ रोजी एकमतानं रत्नागिरी नगरपालिकेनं संमत केला आहे. त्याची कार्यवाही केव्हा होते हेच आता पहायचं !

त्यांच्या पश्चात त्यांचे दोन मुलगे व पत्नी श्रीमती चंद्रावतीबाई या नागपूर येथे वास्तव्य करून त्यांचे रत्नागिरीतील खालच्या आळीतील घर नुकतेच विक्री होऊन एका बांधकाम मक्तेदाराकडे गेलं आहे !

भारतात सैनिकी पेशाला मान्यता चढून वीरवृत्तीला जोर येईल त्या वेळी ते खालच्या आळीतील दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धनांचं घर राष्ट्रीय स्मारक म्हणून होईल तेव्हा होईल ! तोवर रत्नागिरीच्या विमानतळास 'डी लॅकमन पॅट – द. ल. पटवर्धन विमानतळ ' असं नामकरण तरी व्हावं व ते काम दत्तोपंतांच्या जन्मशताब्दि-वर्षापर्यंत–१९८३ पर्यंत तरी पूर्ण व्हावं ! □


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा**
**वेगळा शोध**

**प्रभावी, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

पुस्तके

# Towards Social Integration

**दलितांच्या समस्या आणि उपाय**

Towards Social Integration या पुस्तकाने उच्च शिक्षण घेतलेल्या, समाजात मानाच्या, प्रतिष्ठेच्या जागा मिळवलेल्या, सुशिक्षित दलितांना समाज कशा प्रकारे वागवतो, समाजात मिसळताना या सुशिक्षितांना कोणत्या अडचणी येतात यावर प्रकाश टाकण्याचे महान कार्य लेखक डॉ. देशपांडे यांनी केले आहे. नोकरीमध्ये राखीव जागा दिल्या, शिक्षण घेताना विविध सवलती उपलब्ध करून दिल्या, कायद्याचे संरक्षण दिले की जातिव्यवस्थेचा प्रश्न सुटेल, असा दृष्टिकोन आपल्याकडे बाळगला गेला. शिक्षणामधल्या विविध सवलतींचा, नोकरीमधील राखीव जागांचा काही प्रमाणात दलित समाजाला उपयोग झाला; परंतु अशा सुशिक्षित दलितांना दलितेतर समाजाने खरोखरच स्वीकारले का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. जातिव्यवस्थेची पाळे-मुळे अतिशय खोलवर रुजलेली आहेत बसमध्ये, रेल्वेमध्ये, शेजारच्या माणसाची जात स्वीकारली जात नसेलही; पण भाडेकरूला मात्र जात अवश्य विचारली जाते. नोकरी देतानाही जातीचा विचार केला जातोच. जिथे राखीव जागा आहेत तिथे राखीव जागा पूर्ण प्रमाणात भरल्या जातातच असे नाही. दलित माणूस ऑफिसर म्हणून सरकारी क्षेत्रात स्वीकारला जात असेल; पण त्याच्याशी वागणे 'हलक्या' जातीचा म्हणून होत असेल. किती दलितांना सरकारी क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या याची आकडेवारी आपल्याकडे असते; पण या सुशिक्षित दलितांच्या समस्यांची नोंद, विचार आपल्याकडे नाही. दलित समाजाचा प्रमुख प्रश्न आर्थिक प्रश्न आहे, ही गोष्ट मान्य करूनही सुशिक्षित दलितांच्या सामाजिक समस्येचे स्वरूपही लक्षात घ्यायला हवे. गेल्या काही वर्षांपासून दलित कविता, कथा, थोडेफार आत्मचरित्रात्मक लिखाण मोठ्या प्रमाणावर लिहिले जात आहे. यामधून सुशिक्षित दलितांना दलितेतरांकडून कशी वागणूक मिळते, यांचे प्रासंगिक वर्णन होतेही; परंतु खोलवर जाऊन सुशिक्षितांच्या समस्यांचा विचार करण्याची गरज होती. डॉ. देशपांडे यांच्या पुस्तकाने या समस्यांचा विविध अंगांनी विचार केला आहे.

डॉक्टर, शिक्षक, व्यापारी, राजकारणी, मुख्याध्यापक अशा व्यवसायांत असलेल्या ३० सुशिक्षित दलितांच्या मुलाखती या पुस्तकात संकलित केल्या आहेत. या सर्वांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीमध्ये साम्य आहे. अतिशय खडतर परिस्थितीमध्ये, प्रसंगी नोकरी करून यांच्यापैकी बहुतेकांना शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करावे लागले आहे. घरामध्ये बहुतेकांचे आई-वडील कष्टाची कामे करणारे होते. दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा या बहुतेकांच्या कुटुंबामध्ये भरपूर होत्या; या सर्व मुलाखतींमध्ये शिक्षण घेताना व कामाच्या ठिकाणचा जातीयवादी प्रवृत्तीचा अनुभव सर्वांनी मोकळेपणाने दिलेलाच आहे; पण याचबरोबर धर्मांतर, औद्योगीकरण, शिक्षण, स्वतंत्र दलित-वस्त्या याबाबतच्या मतांचेही संकलन केले आहे. दलितांच्या एकूण संख्येचा विचार करता व सुशिक्षित दलितांची संख्या पहाता ३० ही संख्या कमी आहे, हे लेखकालाही मान्य आहे; परंतु अनुभव व त्यांनी व्यक्त केलेली मते प्रातिनिधिक आहेत. या प्रातिनिधिक स्वरूपामुळेच या मुलाखतींना मोठे महत्त्व आहे.

## शाळा....कॉलेज...ऑफिस....शेजारी आणि जातीयता !

या तीसही व्यक्ती ३० ते ६० या वयांतल्या आहेत. कोणाच्या शिक्षणाला स्वातंत्र्यपूर्व काळात सुरुवात झाली, तर कोणाच्या स्वातंत्र्योत्तर काळात ! आपली जात हलकी मानली जाते, याची पहिली जाणीव शिक्षण घेण्याच्या काळातच या व्यक्तींना वेगवेगळ्या प्रसंगांद्वारा झाली. कोणाला शाळेत छडी फेकून मारली जाई, कोणाला महाराचा म्हणून बाजूला बसवीत, मित्राच्या घरी जेवायला वेगळे बसवले जाई. 'महाराचा असूनही हुशार आहे,' अशा प्रकारे प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात, सलूनमध्ये केस कापले जात नसत. या सर्व अनुभवांतून जातीची पहिली जाणीव या व्यक्तींना झाली. काहीजणांना चांगले शिक्षकही भेटले. चांगले मित्रही भेटले. देवळात वा अन्य ठिकाणी महार म्हणून प्रवेश नाकारला त्या वेळेस एकाचे मित्र भांडलेही ! या सर्व अनुभवांतून शिक्षण व शिक्षक यांचे महत्त्व कळत गेले. फुले, आंबेडकर इत्यादींच्या पुरोगामी विचाराची ओळख याच कालखंडात होत गेली.

जातीयतेचा अनुभव कामाच्या ठिकाणीही अनेकांना आला. विशेषतः सरकारी खात्यामध्ये अधिकारी म्हणून असलेल्या व्यक्तींना तर मोठ्या प्रमाणावरच ! दलित अधिकाऱ्याशी गुर्मीत वागणे, दुरुत्तरे करणे, त्याच्याशी सहकारी म्हणून जिव्हाळ्याचे संबंध नसणे अशा अनेक कटु प्रकारांतून या दलित अधिकाऱ्यांना जावे लागले.

सुशिक्षित दलितांच्या बाबतची मोठी अडचण म्हणजे शहरात नोकरी मिळाल्यावर रहाण्यासाठी जागा मिळविणे. आडनाव ऐकल्यानंतर यापैकी बऱ्याचजणांना शहरात जागा नाकारली गेली. मोठ्या अधिकारपदी असलेल्या एकाची जात कळल्यावर त्याला रहाते घर सोडून जावे लागले. जिथे सरकारी घरे आहेत तिथे अशा अडचणी येत नाहीत; पण सरकारी घरे शहरात अधिकाऱ्यांनाच मिळतात. कारकून वगैरेंना भाड्याच्याच जागा शोधाव्या लागतात.

घर मिळाले तरी शेजाऱ्यांचा प्रश्न येतोच. शेजाऱ्यांच्या जातीयवादी वृत्तीचा अनुभव येतो घरात असणाऱ्या गृहिणीला आणि खेळणाऱ्या मुलांना ! नळावर पाणी भरायला गेलं तर सवर्ण बाईला अंगावर शितोडे उडालेले चालणार नाहीत. महाराचा मुलगा म्हणून लहान मुलाला खेळायला घेणार नाहीत किंवा हिणवतील. सुशिक्षित दलितांना सुद्धा सुशिक्षितांकडून सामाजिक जीवन कसे नाकारले जाते याचेच हे सर्व वर्णन आहे.

या सर्व अडचणींबरोबरच दलितांच्या प्रश्नांशी संबंधित अशा प्रश्नांवर या सुशिक्षितांना प्रश्न विचारले गेले. जातीच्या प्रश्नाला उत्तर म्हणून शिक्षण, औद्योगीकरण, धर्मांतर, स्वतंत्र दलित-वस्त्या हे मार्ग दलित व दलितेतर विचारवंत, राजकीय पुढारी सतत सुचवीत असतात. या चारही मार्गाबाबत या सुशिक्षित दलितांची मनोगते लक्षात घेण्यासारख्या आहेत.

## धर्मांतर ?

जो धर्म वर्णव्यवस्था मान्य करतो तो धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारल्यावर जातीयतेचे कटु अनुभव आपल्याला येणार नाहीत, प्रगतीचा मार्ग खुला होईल अशी धर्मांतरामागची बाबासाहेबांची भूमिका होती. मुलाखत दिलेल्यांपैकी काहीजणांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. काहीजणांचा धर्म वा देव कशावरच विश्वास नसल्याने त्यांच्याबाबत धर्मांतर उद्भवलेच नाही; परंतु या सर्वांचे एका गोष्टीबाबत एकमत आहे की, 'धर्मांतराने दलितांची अस्मिता, आत्मविश्वास' जागा केला तरी धर्मांतराने जातीचा प्रश्न सुटला नाही. सर्व दलित जातींनी धर्मांतर केले नाही, त्यामुळे धर्मांतर फसले.' मुलाखती देणाऱ्यांपैकी काहीजण रोजच्या जीवनात पूजा–अर्चा, पोथीवाचन, इतर कर्मकांड करीत असल्याचा उल्लेख आहे. म्हणजे एक धर्म सोडून दिल्यावर वैज्ञानिक दृष्टिकोन येण्याऐवजी दुसऱ्या प्रकारचे कर्मकांड सुरू झाले आहे. बाबासाहेबांना कर्मकांडात्मक धर्म अभिप्रेत नव्हता. धर्म आणि जातिव्यवस्था यांचा निकटचा संबंध आहे, हे लक्षात घेतल्यानतर धर्माच्या स्वरूपाबाबतची या व्यक्तींची मते पाहणे जरूरीचे आहे.

## कारखान्यामुळे जातीचा प्रश्न सुटला नाही

भारतात मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झाले की, अनेक दलितांना नोकऱ्या मिळतील, वंशपरांपरगत आलेले व्यवसाय जाऊन त्यांना नवीन व्यवसाय मिळतील, नवीन व्यवसाय मिळाला की पहिला जातीचा संदर्भ जाईल आणि हळूहळू जाती कालमडतील, असा विश्वास श्रेष्ठ दलित नेत्यांचा, विचारवंत राजकारण्यांचाही असतो. याबाबत मुलाखत घेताना या दलितांना विचारले असता औद्योगीकरणामुळे जातीचा प्रश्न सुटला नाही, हे बहुतेकांनी ठामपणे सांगितले. औद्योगीकरणामुळे दलितांना मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतील असा विश्वासच चुकीचा आहे, असे त्यांना वाटते. कारण जिथे खाजगी क्षेत्रात औद्योगीकरण होते, तिथे दलितांना नोकऱ्या मिळत नाहीत. सरकारी क्षेत्रातच राखीव जागा असल्यामुळे फक्त तिथेच नोकऱ्या मिळतात. शिवाय कामाच्या ठिकाणी विषम वागणूक मिळते. शिवाय दलितांमध्ये शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहेच.

## स्वतंत्र दलित-वस्त्या नकोत !

ग्रामीण भागात दलितांना असलेली असुरक्षितता, विविध प्रकारचे अत्याचार यामुळे दलित संघटनांकडून वेगळ्या दलित-वस्त्यांची, शिक्षणसंस्थांची परत परत मागणी होत राहते. याबाबत या सर्वांचे मत असे की, आज विविध दलित जातींमध्येच एकी नाही– विषमता आहे. त्यामुळे प्रत्येक दलित-जातीची वस्ती वेगळी करावी लागेल आणि त्यामुळे जातिव्यवस्था दूर होण्याऐवजी जास्त घट्ट होत जाईल. या मागणीमागच्या भावना समजल्या पण मागणी मात्र योग्य नाही, असे बहुसंख्यांचे म्हणणे आहे.

## निकामी शिक्षण

अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेतले, शिक्षण होते म्हणून चांगल्या नोकऱ्या मिळाल्या, जीवनमान उंचावले, यामुळे या सर्वांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन डोळस आहे. काही जणांच्या आयुष्यावर शिक्षकांचा मोठा प्रभाव पडला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणविषयक मताची नोंद घेणं अतिशय महत्त्वाचं आहे. जातिव्यवस्थाविरोधी जाणीवा तयार करण्यात शिक्षणव्यवस्था अपयशी ठरली आहे, असाच बहुसंख्यांचा सूर आहे. दलित विद्यार्थ्याला केवळ शिक्षणसवलती देऊन भागणार नाही, तर त्याला सामाजिकदृष्ट्या सामावून घेणाऱ्या, मिसळून घेणाऱ्या शिक्षणसंस्था व शिक्षकांची गरज आहे. म्हणजेच शिक्षणाचा आशय बदलण्याची आवश्यकता आहे.

शिक्षण आणि धर्मांतरावरच केवळ त्यांचे मतप्रदर्शन थांबले नाही, दलित राजकारणावरही त्यांची मते लेखकाला अपेक्षित होती. पँथर्सबाबत बहुसंख्यांना आशा होत्या; पण आता त्या राहिल्या नाहीत. सर्व दलितांनी एकत्र येण्याची गरज मात्र प्रत्येकाला जाणवली.

विविध विषयांवरील मतप्रदर्शनांचे संकलन झाल्यानंतर, स्वतः प्रा. देशपांडेंनी 'Where do we go from here ?' नावाचे एक विश्लेषणात्मक प्रकरण लिहिले आहे. मुलाखतींच्या निष्कर्षामधून शिक्षणविषयक अनेक बहुमोल सूचना त्यांनी केल्या आहेत. एकीकडे सुशिक्षित दलितांची ही पहाणी जातिव्यवस्थेच्या खोलवर रुजलेल्या मुळांचे चित्रण करते, आजपर्यंत झालेल्या प्रयत्नांवरच्या मर्यादा दाखवते, तर दुसरीकडे या पाहणीमुळे जातीव्यवस्थेच्या प्रश्नाबाबत काय केले पाहिजे, कशा प्रकारचे कार्यक्रम घेतले पाहिजेत, याबद्दलच्याही बहुमोल सूचना मिळतात.

## महान मार्गदर्शक

डॉ. देशपांडे यांचा दलितांच्या समस्येशी केवळ पुस्तकी परिचय नाही. पुण्याच्या विषमतानिर्मूलनसमिती, ग्रामायन या संस्थांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. या संस्थांच्या प्रत्यक्ष कार्यातही त्यांचा सहभाग असतो. विद्यार्थ्यांशीही त्यांचा संबंध आहे. या सर्व कार्याचा, ही पहाणी करताना आणि पहाणीसाठी ढोबळ मानाने त्यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्याचा चांगलाच उपयोग झाला आहे. दलितांच्या विविध जातींच्या आर्थिक पहाण्या सतत चालू आहेत. आजच्या पुरोगामी चळवळीसमोरच्या काही प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी नव्या दिशांची चाचपणी करण्यासाठी ही पाहणी मार्गदर्शक ठरणार आहे, यात शंका नाही. कारण दलितांबद्दलचे, जातिव्यवस्थेबद्दलचे मूलभूत प्रश्न अनुभवाधारे त्यांनी उभे केले आहेत.

वास्तविक हे पुस्तक मराठी भाषेतही यायला हवे. पुण्यातल्या एका महाविद्यालयात औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाचे वार्षिक काही विद्यार्थ्यांना वाचायला दिले. त्या वार्षिकात दलित विद्यार्थ्यांचे आत्मकथन होते. जातिव्यवस्थेच्या भीषण अनुभवांचे चित्रण होते. वाचणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या सत्यकथा अतिरंजित काल्पनिक वाटल्या, हा अनुभव स्वतः लेखकानेच दिला आहे. शहरातल्या विद्यार्थ्यांना, कामगारांना जातिव्यवस्थेचे भीषण अनुभव समजू शकत नाहीत.

आपल्याकडे सामाजिक विषयावरचे सहज सोपे लिखाण मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नाही. दलित नियतकालिके, अन्य पुरोगामी मासिके शहरातील बहुसंख्य महाविद्यालयांच्या ग्रंथालयांत नसतात. कॉलेजच्या शाळेच्या पाठ्यपुस्तकात नामदेव ढसाळ किंवा नारायण सुर्व्यांची कविता असली तरी तिच्यामध्ये ज्या सामाजिक परिस्थितीवर कोरडे ओढलेले असतात ती परिस्थिती स्पष्ट करण्याऐवजी शिकवणाऱ्या प्राध्यापकाचा शिक्षकाचा कल 'प्रतिभेची उंची' मोजण्याकडे रहातो. आज राखीव जागाविरोधी नामांतरविरोधी उग्र आंदोलने, दलितांवरचे विविध अत्याचार, शासनाचे त्याकडे लक्ष न देणे हे सर्व पाहिल्यावर जातिव्यवस्थेविरोधी लढा लांबवरचा आणि कठीण आहे, हे लक्षात येतेच. आजच्या पुरोगामी चळवळीला ललित साहित्य, वैचारिक साहित्य कमी आहे. या पार्श्वभूमीवर हे पुस्तक, मराठीत आले तर बरे होईल. याचा काही भाग मे '७६ च्या' पुरोगामी सत्यशोधक'मध्ये जरी येऊन गेला असला तरी पुस्तकामध्ये ज्या विविध प्रश्नांवरचे संकलन आहे, त्या स्वरूपात पुस्तिका / पुस्तक येणे जरुरीचे आहे.

खरं तर इतर सूचना करण्याची ही जागा नाही, हे लक्षात घेऊनसुद्धा या पुस्तकावर सामाजिक संघटना, प्रकाशनसंस्था, साहित्यचर्चामंडळ, महाविद्यालयीन वादविवाद मंडळे यांनी चर्चा घडवून आणायला पाहिजेत. कारण दलितांच्या समस्येचे स्वरूप व त्यावरचे उपाय, मार्ग याबाबत अनेक प्रश्न या पाहणीने उपस्थित केले आहेत.

—लता भिसे

**Towards Social Integration**

**Problems of adjustment of Scheduled Caste elite.**

ले. — प्रा. वसंत देशपांडे,
प्रकाशक : शरद गोगटे, पुणे ४११००५.
पृष्ठे २२६, किंमत ४५ रु.

❀

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# दिल्लगी

## दिल्लगी गरीब बिचाऱ्या प्रेक्षकांची

'दिल्लगी' या नावाचा एक अत्यंत मोठा पीळ पुण्यात सध्या उलगडला जात आहे. हा चित्रपट एखाद्या सामान्य दिग्दर्शकाचा असता तर त्याच्याकडे फारसे लक्ष जाण्याचे वा देण्याचे कारणही नव्हते; पण चुकून हा पडला दिग्दर्शक बासू चटर्जींचा चित्रपट. साहजिकच विचक्षण टीकाकारांपासून ते गरीब बिचाऱ्या रसिक प्रेक्षकांपर्यंत सर्वांना त्याची ओझरती का होईना, दखल घ्यावीच लागते.

बासू चटर्जींना प्रेमाचे पदर उलगडायला फार आवडतात. 'रजनीगंधा'तील भूतकाळ अन् वर्तमानकाळात हेलकावे घेणारा प्रेमाचा लंबक, 'छोटीसी बात'मधील मिश्किल, फिल्मी प्रेम, 'चितचोर'मधील निरागस, नितळ प्रेम, 'स्वामी'मधील गंभीर, संयमी प्रेम, 'खट्टा-मीठा'मधील कौटुंबिक (किंवा पार्शी कौटुंबिक) प्रेम इत्यादी इत्यादी अनेक चित्रपटांकडे उदाहरणार्थ म्हणून बोट दाखविता येईल. त्यातही विशेषत: स्त्रीच्या मनाचे धागे गुंफणे त्यांना विशेष आवडते; त्यामुळेही असेल. कदाचित— जेव्हा जेव्हा त्यांच्या चित्रपटात प्रेमाचा त्रिकोण आला आहे, तेव्हा तेव्हा पुरुष हा स्थिर ( Static ) बिंदू राहिला आणि स्त्री हा गतिमान (dynamic) बिंदू बनला. 'दिल्लगी'मध्ये हा प्रकार दिसतोच. त्यातही प्रा. स्वर्णकमलच्या वाटचालाा फक्त इमानेइतबारे हिरव्या सिग्नलची वाट पाहत राहणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे आले; तर फुलरेणूची व्यक्तिरेखा मात्र बदलती— सुरुवातीची जबाबदारीच्या जोखडामुळे जीवनातील प्रेमापासून संपूर्ण अलिप्त आणि नीरस अशी फुलरेणू हळूहळू बदलत जाते. प्रत्येक गोष्टीतील ओलावा, रस शोधू लागते आणि साहजिकच शेवटी प्रा. स्वर्णकमलांच्या गाडीला हिरवा सिग्नल मिळतो. 'दिल्लगी'मध्येही बासूदांच्या आधीच्या बऱ्याच चित्रपटांप्रमाणे नायिकेचे प्रेम मिळविण्यासाठी अत्यंत योजनाबद्ध पावले टाकणारा नायक आहे. त्याने वापरलेल्या युक्त्या, नायक-नायिकांची डावी-उजवी होतानाचे प्रसंग चित्रपटात बासूदांनी त्यांच्या नेहमीच्या हलक्या-फुलक्या वगैरे वगैरे शैलीत फुलवले वगैरे आहेत; पण हे त्यांचे हलके फुलकेपण आणि त्यांचे फुलोरेपणच आता तेच तेच आणि त्यामुळेच जुनाट वाटायला लागले आहे. 'दिल्लगी'मध्ये संपूर्ण चित्रपट एक मोठा पीळ वाटतो, तो त्यामुळेच. ज्याप्रमाणे एखादा विनोद पहिल्यांदा ऐकल्यानंतर आपण दिलखुलास हसतो, त्याच माणसाकडून दुसऱ्यांदा ऐकला की, आठवणीने आपण थोडेसे हसतो आणि त्याला माफ करतो; पण तिसऱ्यांदा तोच विनोद (त्याच किंवा दुसऱ्याही माणसाकडून) ऐकणे म्हणजे मोठा पीळच.

दिल्लगीमध्ये असे पीळ विनोद भरपूर. त्यांच्या भाऊगर्दीत खरोखर दिलखुलास हसायला लावणारे विनोदही पुढे यायला घाबरतात. संपूर्ण चित्रपटभर, प्रत्येक प्रसंगामधून हा नाविन्याचा अभाव बासू चटर्जींनी टिकवून धरला आहे. ज्या थोड्याफार प्रसंगांमध्ये असा अभाव नाही, ते बिचारे प्रसंगसुद्धा त्यांनी इतके ताणले आहेत की, त्यांच्यामधील विनोदाचा एकाच चित्रपटात पीळ बनला आहे. उदाहरणार्थ— प्रा. स्वर्णकमलाचा संस्कृतचा तास व प्रा. फुलरेणूचा रसायनशास्त्राचा तास ही जुगलबंदी दोन्ही वाद्ये पूर्ण उतरेपर्यंत वारंवार दाखविण्याची आवश्यकता होती का? शेवटची पंधरा मिनिटे म्हणजे तर 'आपल्याला डोके नावाचा अवयव नाही आणि तरीही तो दुखू शकतो' याची प्रत्येक प्रेक्षकाला जाणीव देण्यासाठीच बनविलेला डोस असावा. या पंधरा मिनिटांतील स्वर्णकमलाचा प्रवास, प्रवास फुलरेणूचे खोटेखोटे लग्न, स्वर्णकमलाची पिटाई इत्यादी सर्व भाग बघून दिग्दर्शक म्हणून बासू चटर्जींचे नाव चुकून पडले असावे, असे वाटू लागते. एखादा विनोद सांगायचा आणि मग त्यातील 'विनोद' समजावून द्यायचा, असाच हा प्रकार झाला आहे. फुलरेणूने स्वर्णकमलला आपल्या घरी पत्र लिहिण्यास सांगणे, ते त्याने न लिहिल्याने फूलरेणूचा झालेला घोटाळा व तिने भलत्याच प्राध्यापकाला दिलेली पसंती

त्यातून जन्मणारा ब्रह्मघोटाळा आणि तो निस्तरण्यासाठी दिग्दर्शकाने योजलेला परब्रह्मघोटाळा हा सगळा प्रकार विनोदी न वाटता तद्दन रद्दड, भिकार, पोरकट आणि हास्यास्पद वाटतो. संपूर्ण चित्रपटच इतका उथळ आहे की, ' स्वर्णकमल व फूलरेणू हे प्राध्यापक असूनही इतके अपरिपक्व कसे ?' असे सखोल प्रश्न यात मावतच नाहीत. साहजिकच केलेले व्यक्तिचित्रण, मग ते योग्य की अयोग्य असे अडचणीत टाकणारे व निष्कारण वाद माजविणारे प्रश्न आपोआप बाद होतात. कथेच्या निवडीपासून पटकथा-रचना, प्रसंग हाताळण्याची शैली ते संवादांपर्यंत सगळीकडे असेच जाणवते की, ' हे जर आपण पहिल्यांदाच पाहात असतो, तर ते आवडले असतेही; पण आता मात्र तेच ते अन् तेच ते पाहण्याचा आणि सहन करण्याचाही कंटाळा आला आहे. '

धर्मेंद्रला प्रा. स्वर्णकमलची भूमिका मिळाली आहे. त्याचे पडद्यावरील दर्शन असह्य नाही, असा अनुभव बऱ्याच दिवसांनंतर मिळाला. प्रा. फुलरेणू बनली आहे हेमामालिनी. अभिनयाच्या वाटेला फारसे न जाता छान दिसण्याचे काम तिने प्रामाणिकपणे केले आहे. बाकी असरानी, शत्रुघ्न सिन्हा, मिठू चक्रवर्ती, प्रीती गांगुली, केश्तो मुकर्जी इत्यादी लोक असून ज्याप्रमाणे सिनेमाचा चांगलेपणा फारसा वाढला नाही, त्याचप्रमाणे हे कोणी नसते, तरी त्याचा पोळपण फारसा वाढला नसता.

चित्रपटात गीतलेखनाची आघाडी होती योगेशकडे व संगीताची बाजू सांभाळली होती राजेश रोशनने. 'प्रेम तो प्रेम है पिया मन की मधुर एक भावना ' आणि ' मैं कौनसा गीत सुनाऊँ क्या गाऊँ ' ही दोन गीते अतिशय सुरेख झाली आहेत. स्वर्णकमलाच्या व फुलरेणूच्या ' डाव्या–उजव्या ' झडताना पार्श्वसंगीतासाठी वारंवार वापरलेला एक तुकडा अतिशय सुरेख.

बाकी चित्रपटाबाबत सांगणे एकच–

बासूजी चटर्जीजी, हा हलके-फुलकेपणा अन् फुलोरा-बिलोरा आता एक तर बास, नाही तर जरा वजन आणि रंग, फुले बदलून तरी आणा !

*

# देवता

## कात्रीला धार जरा जास्त हवी होती...

आतापर्यंत माझी समजूत होती की, चित्रपट दोन प्रकारचे असतात. एक–जाताना डोके बरोबर न्यावे लागते असे आणि दोन–जाताना डोके घरी ठेवावे लागते असे; पण ' देवता ' पाहिल्यानंतर मला एक तिसराही प्रकार कळला. या प्रकारात काही वेळा डोके मागवावे लागते आणि काही वेळा ते आवर्जून घरी पाठवून द्यावे लागते.

एका साध्या–सरळ पण भडक डोक्याच्या माणसाची ही कथा. साधा, सरळ आणि भडक या तीन विशेषणांमधूनच संपूर्ण कथेतील सर्व प्रसंगांना येत असलेला अतिनाटयाचा वास येतोच. कारण साधा, सरळ माणूस म्हटला की, त्याच्या वाटयाला येणारा वाकीच्यांचा वाकडेपणा आलाच. ओघाने दोघांमधील संघर्ष, त्यात त्या माणसाचे डोके भडक–या सगळ्या साखळीचा उपयोग चित्रपटातील प्रत्येक प्रसंगात केला आहे आणि सर्व प्रसंगांमध्ये नको नको इतके नाटय ठासून, चेचून भरले आहे. उदाहरणार्थ–टोनी एका मरणोन्मुख म्हातारीसाठी कॉफीन तयार करीत असतो; त्यामुळे बायकोच्या ऐन बाळंतपणाच्या वेळी त्याला हॉस्पिटलमध्ये जाता येत नाही. ज्या म्हातारीसाठी ती कॉफीन त्याने बनविलेली असते, ती वाचते आणि टोनीची बायको मेल्याने तिला त्या कॉफीनमध्ये घालतात. ओ हो ! केवढे हे नियतीचे क्रूर नाटय ! किंवा–


कर्मू लोहाराच्या मुलाने शाळामास्तराच्या मुलीवर बलात्कार केल्याने टोनी त्याला यथेच्छ पिटतो; पण टोनीच्या मुलीच्या नशिबातही असाच तथाकथित प्रियकराकडून फसविले जाण्याचा प्रसंग ओढवावा, हे केवळ दुर्दैवविलासी किंवा दैवदुर्विलासी नाटय ! चित्रपटात जेलमधून पळून गेलेला टोनी पुढे तरुणकुमार बनून येतो तेव्हा तो आणि त्याच्या मागावरील इन्स्पेक्टर लॉरेन्स यांचे प्रसंग म्हणज तर नाटयच नाटय आहे. हे सगळे ठासून भरलेले नाटय आणि चित्रपटाची लांबी जर कमी केली असती, तर मला जो वारंवार डोके घरी पाठविण्याचा व ते परत मागविण्याचा उद्योग करावा लागला, तो करावा लागला नसता.

कथेतील काही अतिकच्चे दुवे (टोनीच्या अचानक श्रीमंतीचा चमत्कार) आणि ' सत्यमेव जयते ' वा ' सर्वशक्तिमान आकाशातल्या बापाचा विजय असो ' छाप शेवट सोडला, तर चित्रपटाची कथा चांगली होती. संपूर्ण कथा म्हणजे टोनीचे व्यक्तिचित्रणच असल्याने त्याला महत्त्व मिळणे ओघाने आलेच. टोनीची भूमिका संजीवकुमारने केली आहे, एवढे एक वाक्य लिहिल्यानंतर अधिक काही लिहिण्याची आवश्यकताच नाही. त्याच्याशिवाय इतर सर्वच पात्रांनी आपापली कामे व्यवस्थित केली आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शक एस्. रामनाथन यांनी कथेतील सगळे नाटय जपण्याचा इतकेच नव्हे तर संवाद, पात्रांच्या हालचाली यांमधून ते सतत वाढविण्याचा पार शेवटपर्यंत अट्टाहास चालू ठेवला होता. टोनी व त्याच्यामागे लागलेला इन्स्पेक्टर लॉरेन्स यांच्यासाठी वापरलेले खेकडा व गिधाड यांचे प्रतीक अत्यंत ढोबळ. असे प्रतीकात्मक वा चिन्हांकित वगैरे दिग्दर्शन दाखविण्याआधी त्यांनी जर पहिल्या क्षणाला निरभ्र आकाश, दुसऱ्या क्षणाला वादळी पाऊस अशा गोष्टी टाळल्या तर फार बरे होईल. खरे तर सर्व पात्रांना पद्धतशीर वाव देणे एवढेच कौशल्य त्यांना दिग्दर्शक म्हणून दाखवायचे होते, ते त्यांनी पार पाडले. शिवाय एकूण चित्रपटाचे वातावरण ख्रिस्ती होते, तेही त्यांनी नीट सांभाळले.

संपूर्ण चित्रपटातील गाणीबजावणी हा तर अत्यंत अनावश्यक आणि सर्व दृष्टींनी टाकाऊ प्रकार होता. केवळ गाण्यांशिवाय चित्रपट ही कल्पना असह्य झाल्यामुळेच ही गाणी घुसडली असावीत. अगदी असाच प्रकार केश्तो मुकर्जी आणि त्याच्या मित्राच्या विनोदाचा. हे केलाराम आणि मेलाराम मिळून चित्रपटातील विनोदाचा पार काला करून टाकतात.

या सगळ्या गोष्टी टाकून चित्रपट अधिक प्रभावी बनविण्यासाठी चित्रपटाला लावायच्या कात्रीला अजून जास्त धार हवी होती. □


Season's Greetings
Gestetner
Indian Duplicator Company Limited
6, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110 002.